**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २१.०३.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्रधान सचिव (कामगार) यांचे उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ४५ वी बैठक बुधवार दिनांक २१.०३.२०१८ रोजी दुपारी ४.३० वा. परिषद सभागृह, हॉल क्र. ५, ७ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व निमंत्रित उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ तथा मा. मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण). |
| २. | श्री. राजेश कुमार | मा. प्रधान सचिव (कामगार)- निमंत्रित |
| ३. | श्री. एन. के. पोयाम | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ४. | श्री. रत्नराज जवळगेकर | मा. संचालक व लेखा कोषागारे (शासकीय प्रतिनिधी) यांचे प्रतिनिधी |
| ५. | श्री. शशांक साठे | मा. उपसचिव -कामगार (शासकीय प्रतिनिधी) |
| ६. | श्री. सतीश मगर | मा. मालक प्रतिनिधी |
| ७. | श्रीमती वेदा आगटे | मा. मालक प्रतिनिधी |
| ८. | श्री. श्रीपाद कुटासकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ९ | श्री. विजय देवरुखकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| १० | श्री. अशोक भुताड | मा. कामगार प्रतिनिधी |
| ११ | श्री. श्री. चु. श्रीरंगम | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदयांचे व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक ०३.०१.२०१८ रोजीच्या मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

## बैठकीचे इतिवृतांत

**विषय क्र. १: मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

मंडळाच्या दिनांक ०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांत मंडळ सचिव यांनी वाचुन दाखविले व ठरावनिहाय केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल मंडळास सादर केला. सदर इतिवृत्तात काही बदल करावयाचे असल्यास त्यासह इतिवृत्त कायम करणे प्रस्तावित आहे, अशी विनंती मंडळ सचिव यांनी केली.

दिंनाक ०३.०१.२०१८ रोजीच्या इतिवृत्तामध्ये विषय क्र. ४ मध्ये दिनांक ०३.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार बांधकाम कामगारांना घरे देणे शक्य नाही. कारण सदर शासन निर्णयामध्ये सदर कामगारास या योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्या कामगाराचे देशात कुठेही घर असू नये अशी अट आहे त्यामुळे या योजनेचा फारसा लाभ बांधकाम कामगारांना घेणे शक्य होत नाही, परराज्यातील बांधकाम कामगारांकडे लहान-मोठे वडिलोपार्जित घर असते. असे मा. मालक प्रतिनिधी श्री. मगर यांनी सुचविले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

त्यावर मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी प्रत्येक नोंदित बांधकाम कामगारांस घरखरेदी करण्यासाठी रु. २ लक्ष अनुदान मंडळामार्फत देण्यात यावे असे निर्देश दिले.

मंडळाच्या दिनांक ०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या दिनांक ०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतील विषय क्र. ४ वरील ठरावात अंशत: बदल करून सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे, विषय क्र. ४ वरील ठरावानुसार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या नोंदित बांधकाम कामगारांना मंडळाकडून द्यावयाच्या रु. २ लक्ष अनुदानाशिवाय अन्य नोंदित बांधकाम**

कामगार स्व:खर्चाने घर खरेदी करत असतील अथवा घर बांधणी करत असतील तर अशा नोंदित बांधकाम कामगारांना सुद्धा रु. २ लक्ष एवढे अनुदान मंडळाकडून देण्यात यावे, याबाबत अटी शर्ती निश्चित करून तसा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. २:नोंदित बांधकाम कामगारांसाठी आरोग्य तपासणी करण्याबाबतच्या योजनेचे सादरीकरण करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, इमारत व इतर बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या बांधकाम कामगारांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार विविध आजारांना सामोरे जावे लागते. बांधकाम कामगारांचे आर्थिक स्थिती अत्यंत कमकुवत असल्याने आजारावरील औषधोपचार वेळीच घेतले जात नाहीत. परिणामी, काही आजार गंभीर स्वरुप धारण करतात असे निदर्शनास आले आहे.

मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.०२.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ ओळखपत्राच्या आधारे देण्यात येत आहे. तथापि, काही बांधकाम कामगारांना सदर योजनेबाबत व उपचाराबाबतच्या पध्दतीची सविस्तर माहिती नसल्यामुळे बांधकाम कामगार सदर योजनेचा लाभ घेऊ शकले नाही असे निदर्शनास आले. यास्तव बांधकामाच्या ठिकाणी काम करत असलेल्या कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करून त्यावर वेळीच उपचार केल्यास बांधकाम कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करणार नाही.

बांधकाम कामगारांकरीता बांधकामाच्या ठिकाणी त्यांच्या आरोग्य तपासणी करणे या विषयाबाबत मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत चर्चा करून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

ठराव: नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मंडळामार्फत कॅम्प आयोजित करून सदर कॅम्पमध्ये आरोग्य तपासणी करण्यात यावी. आरोग्य तपासणीत आढळून येणाऱ्या गंभीर आजाराबाबत करावयाची उपाययोजना बाबतचा आराखडा तयार करावा. आरोग्य तपासणीकरीता त्या क्षेत्रातील अनुभवी संस्थेची नेमणूक करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. सदर योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुते घेण्यात आला.

मंडळाच्या उपरोक्त ठरावास अनुसरून या क्षेत्रातील काम करणाऱ्या मे.क्लिनिक ऑन साईट प्रा.लि. पुणे या संस्थेकडून मंडळास प्रस्ताव प्राप्त झालेला असून सदर प्रस्तावातील ठळक बाबी खालीलप्रमाणे:-

१. बांधकामाच्या ठिकाणी भेट देऊन आस्थापनाकडील (ठेकेदार) हजेरी पटावरून नोंदीत बांधकाम कामगारांची यादी तयार करणे.
२. ज्या बांधकाम कामगारांचे नोंदणी झालेली नाही त्यांची मंडळाकडे नोंदणी करून घेणे.

३. आरोग्य तपासणी करीता खालीलप्रमाणे दोन गट तयार करण्यात येतील.

अ) वय वर्षे १८ ते ४० असलेले बांधकाम कामगार- आरोग्याची तपासणी प्रतिवर्षी केली जाईल.

ब) वय वर्षे ४० ते ५०असलेल्या बांधकाम कामगार- आरोग्याची तपासणी दर ०९ महिन्यांनी केली जाईल.

क) वय वर्षे ५० ते ६०असलेल्या बांधकाम कामगार- आरोग्याची तपासणी दर ०६ महिन्यांनी केली जाईल.

४. गंभीर आजाराच्या रुग्णांना संस्थेमार्फत किंवा शासनाच्या रुग्णवाहिकेमार्फत (१०८) रुग्णालयात दाखल करण्यात येईल.

५. आरोग्य तपासणीमध्ये निदर्शनास आलेल्या किरकोळ आजारावरील उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात येईल व गंभीर आजाराबाबत संस्थेच्या पथकाद्वारे महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मंजूर रुग्णालयात रूजू करण्यात येईल.

६. गंभीर आजार असलेल्या रुग्णांची नियमित तपासणीचे वेळापत्रक तयार करण्यात येईल.

७. रूग्णाच्या आजारावरील उपचारानंतर डिस्चार्ज समरीची नोंद संगणकीय प्रणालीमध्ये घेण्यात येईल व त्याचा वापर पुढील कार्यवाहीकरीता (Follow up) करण्यात येईल.

८. रूग्णाच्या उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेमार्फत करण्यात येईल.

९. महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेमार्फत उपचार करताना खर्चाच्या मर्यादेपक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती मंडळामार्फत करण्याता येईल.

१०. नोंदीत बांधकाम कामगारांना गंभीर आजारावरील उपचाराकरीता रुग्णालयात रहावे लागेल त्या कालावधीतील वेतन नुकसान भरपाई मंडळामार्फत देण्यात येईल.

सदर प्रस्तावातील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांसाठी आरोग्य तपासणी करण्याबाबतच्या योजनेचे सादरीकरण मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि.,पुणे यांचेमार्फत करण्यात येणार आहे.

तद्नंतर मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि.पुणे यांच्या प्रतिनिधींनी बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी कशा प्रकारे करण्यात येईल, कामगारांना कोणत्या आजारांना सामोरे जावे लागते, आरोग्य तपासणी मध्ये कोणकोणत्या घटकांचा समावेश करण्यात येईल सदर आरोग्य तपाणीमुळे कामगारांना काय फायदा होईल इत्यादीबाबतचे सादरीकरण केले.

सदर सादरीकरणा दरम्यान मा. कामगार आयुक्त यांनी सदर आरोग्य तपासणी मध्ये मुख्यत्वे कान, डोळे इत्यादीचा समावेश करावा. तसेच अंतर्भूत असलेल्या गंभीर आजारांचीही

तपासणी करण्यात यावी. असे सुचित केले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली. मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी सुचित केले की, आरोग्य तपासणी पथकामध्ये समाविष्ट डॉक्टर संख्या, त्यांचेकडे उपलब्ध तपासणीचे साहित्य,औषधे, तपासणीस लागणारा वेळ, तपासणीचे घटक त्यानुसार कोणत्या आजाराचे निदान होवू शकेल याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे. बांधकाम कामगाराच्या कामाच्या स्वरुपास अनुसरून निदर्शनास येणाऱ्या आजारांचा मुख्यत्वेकरून आरोग्य तपासणीत समावेश करणे आवश्यक राहिल. याबाबत मंडळ सचिव यांनी असा खुलासा केला की, या सर्व बाबींचा समावेश करून प्रस्ताव तयार करण्यात येईल याकरीता सार्वजनिक आरोग्य विभाग /वैद्यकीय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांशीही चर्चा करुन प्रस्ताव तयार करण्यात येईल व सादर योजना प्रथम प्रायोगिक तत्वावर राबविण्याचे प्रसतावित आहे. यावर मा. मंत्री महोदय (कामगार) तथा मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी निर्देश दिले की, सदर योजना प्रथम प्रायोगिक तत्वावर एका जिल्ह्यात राबविण्यात यावी, त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शिविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. सदर आरोग्य तपासणी पथकामध्ये समाविष्ट डॉक्टर संख्या, त्यांचेकडे उपलब्ध तपासणीचे साहित्य, औषधे, तपासणीस लागणारा वेळ, तपासणीचे घटक त्यानुसार कोणत्या आजाराचे निदान होवू शकेल याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करावा. बांधकाम कामगाराच्या कामाच्या स्वरुपास अनुसरून निदर्शनास येणाऱ्या आजारांचा मुख्यत्वेकरून आरोग्य तपासणीत समावेश करण्यात यावा. सदर योजना प्रथम तीन महिने प्रायोगिक तत्वावर एका जिल्ह्यात राबविण्यात यावी व तद्नंतर आरोग्य तपासणी योजना राज्यातील इतर जिल्ह्यात राबविण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ३: नोंदित बांधकाम कामगारांना सायकल वाटपाबाबतच्या कार्यवाहीचे सादरीकरण करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, राज्यात इमारत व इतर बांधकामाच्या कामाचे ठिकाण हे शहरामध्ये, शहराच्या बाहय भागात व शहरापासून दूर अंतरावर विखुरलेले असतात. बांधकामाच्या ठिकाणी जाण्याकरीता वाहनांची सुविधा नसते. बांधकाम कामगारांना कामाकरीता त्यांच्या राहत्या ठिकाणापासून दूर दूर पर्यंत पायी जाण्याशिवाय पर्याय राहत नाही. बांधकाम कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी वेळेत आणि विना अडथळा पोहचता यावे याकरीता सायकल सारख्या माध्यमाची आवश्यकता आहे. सायकलच्या किंमतीबाबत सायकल विक्री करणाऱ्या कंपन्यांच्या संकेतस्थळाना भेट दिली असता Atlas Black Bicycle ची किंमत रु.४२२१/- तर Hercules Rocky RF २४ Hybrid Cycle ची किमत रु. ४१००/- एवढी असून याशिवाय शासकीय कर अदा करावे लागतील. याबाबत मंडळाच्या बैठकीत चर्चेअंती नोंदित बांधकाम कामगारांना सायकल खरेदीसाठी रु. ४५००/- एवढी रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी, असे ठरले. त्यानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सायकल वाटप करणेबाबत मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत "नोंदित बांधकाम कामगारांना सायकल खरेदीसाठी रु. ४५००/- एवढी रक्कम त्यांच्या बँक खात्यात DBT पद्धतीने जमा करण्यात यावी, याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करून शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला."

उक्त ठरावाच्या अनुषंगाने दि.२२.०६.२०१७ रोजी सदर योजना मंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावामध्ये काही त्रुटी असल्याबाबत शासनाने दि.११.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मंडळास कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर पत्राच्या त्रुटीची पूर्तता करून मंडळाचे अभिप्राय शासनास दि.२१.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार शासनाने दि.१२.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर योजना राबविण्याबाबत तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

नोंदीत बांधकाम कामगारांच्या कुटूंबाना दि. ०१ मार्च २०१७ च्या शासन आदेशान्वये हत्यारे व अवजारे खरेदीकरीता रू.५०००/- एवढे अर्थसहाय्य देणेबाबत निर्णय घेण्यात आला. तदनंतर दि.०७.०३.२०१८ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये प्रति कुटूंबाऐवजी प्रति लाभार्थी

रू.५०००/- एवढे अर्थसहाय्य देणेबाबत निर्णय घेण्यात आला. माहे मे २०१७ पासून सदर योजनेंतर्गत अर्थसहाय्याचे वाटप करण्यात येत आहे. तथापि, क्षेत्रिय कार्यालयांकडून व अन्य संस्थाकडून प्राप्त माहितीनुसार बांधकाम कामगारांना दिलेल्या अर्थसहाय्यामधून सर्वच कामगार हत्यारे अवजारे खरेदी करत नाहीत असे निदर्शनास आले.

नोंदीत बांधकाम कामगारांना सायकल खरेदीकरीता द्यावयाची प्रतिलाभार्थी रू.४५००/- एवढे अर्थसहाय्य रोख स्वरूपात त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याऐवजी नियोजन विभागाच्या दि.०५.१२.२०१६ रोजीच्या शासन आदेशातील अटीनुसार बांधकाम कामगाराने प्रथम सायकल खरेदी करावी व तदनंतर सायकल खरेदीच्या रक्कमेची प्रातिपूर्ती मंडळाने करावी जेणेकरून योजना राबविण्याचा उददेश सफल होईल. यास्तव सदर क्षेत्रातील विविध संस्थांसोबत विचार विनिमय करण्यात आला.

सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत मे. टीएमडब्ल्यू या संस्थेने मंडळाकडे प्रस्ताव सादर केला आहे. मे. टीएमडब्ल्यू या संस्थेकडून योजनेच्या अंमलबजावणीच्या पध्दतीबाबत आजच्या बैठकीत सादरीकरण करण्यात येणार आहे. त्यानुसार मे.टीएमडब्लू या संस्थेच्या प्रतिनिधींना सादरीकरणाबाबत विनंती करण्यात आली.

तद्नंतर मे. टीएमडब्ल्यूच्या प्रतिनिधींनी सायकलवाटपबाबतचे सादरीकरण केले. त्यामध्ये कामगारांना सायकल कशी पुरवण्यात येईल, तसेच सदर मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या रक्कमेचा वापर कामगार फक्त सायकल खरेदीसाठीच करू शकतो असे सादर केले. सदर कामगारास सायकल खरेदी करण्यासाठी त्याच्या नावाचे एक कार्ड दिले जाईल. जेणेकरून सदर कामगारस सायकल खरेदीसाठीच त्या योजनेचा लाभ घेता येईल.

त्यावर मा. प्रधान सचिव यांनी कामगारास वाटप करण्यात येणाऱ्या सायकलचे मॉडेल व संस्था मंडळाने निश्चित करावी असे सुचविले. त्यास उपस्थितांनी सहमती दर्शविली. त्यावर मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, सायकल खरेदी कोणत्या संस्थेकडून करावी, सायकलची किंमत,मॉडेल ठरवण्याचे अधिकार मंडळाला असतील. मंडळाने निश्चित केलेल्या संस्थेकडून सायकल वाटप करण्याचे काम मे. टीएमडब्ल्यू कंपनी करेल. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

त्यावर मा. उपसचिव (कामगार) यांनी बांधकाम कामगारांना सायकल वाटप करताना सदर सायकल बांधकाम कामगारांची आहे हे ओळखण्यासाठी सायकलवर मंडळाचे नाव अथवा लोगो असावा, असे मत व्यक्त केले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

ठराव: नोंदित बांधकाम कामगारांना सायकल वाटप करणेबाबतच्या सादरीकरणानुसार बांधकाम कामगारांना उपयुक्त ठरेल अशा पद्धतीने सायकलचे स्पेशिफीकेशन, उत्पादक संस्था, व सायकल वाटपाची कार्यप्रणाली इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासह प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.४:अटल विश्वकर्मा योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियानाबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत मंडळातील बांधकाम कामगारांच्या नोंदणीबाबत आढावा घेण्यात आला. सदर बैठकीत मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या फारच कमी असल्याचे मत व्यक्त केले आहे.

तसेच, मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी मंडळात जास्तीत जास्त बांधकाम कामगारांची नोंदणी करण्याकरीता उपाययोजना करण्यात याव्यात असे सूचित केले. त्यानुसार मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी महाराष्ट्रात प्रथम विभागीय स्तरावर बांधकाम कामगारांचे एक विशेष नोंदणी अभियान माहे फेब्रुवारी २०१८ ते मार्च २०१८ या कालावधीत राबविण्यात यावे, असे निर्देशित केले.

सदर विषयास अनुसरून मंडळाच्या बैठकीत बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी प्रथम टप्प्यात मुंबई (MMR क्षेत्र), पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या सहा ठिकाणी माहे फेब्रु / मार्च २०१८ या कालावधीत एक महिन्याचे विशेष नोंदणी अभियान राबविण्यात यावे. सदर अभियानाकरीता त्या त्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा घेण्यात याव्यात. सदर अभियानाची प्रसार, प्रसिद्धी करण्यात यावी असा ठराव पारित करण्यात आला.

- मा. प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली व मा. कामगार आयुक्त यांच्या उपस्थितीत कामगार आयुक्त कार्यालयातील अप्पर कामगार आयुक्त, कामगार उप आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त यांची दि.१८.०१.२०१८ रोजी संपन्न बैठकीत खालीलप्रमाणे विशेष नोंदणी अभियान राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १. | विशेष नोंदणी अभियान कालावधी | २३ फेब्रुवारी ते २३ मार्च २०१८ |
| २. | अभियानाचे उददीष्ट | १.अनोंदीत बांधकाम कामगारांची नोंदणी करणे.<br>२.अनोंदीत आस्थापनांची नोंदणी करणे. |
| ३. | अभियान नियंत्रण अधिकारी | संबंधित विभागाचे अप्पर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त |

| | | |
|---|---|---|
| ४. | अभियानाचे ठिकाण | १.मुंबई (MMR) २. पुणे ३. औरंगाबाद ४.नाशिक ५. अमरावती ६. नागपूर |
| ५. | नोंदणी केंद्र | प्रति दिन १०० बांधकाम कामगारांची नोंदणी विचारात घेऊन लक्षांकानुसार केंद्र संख्या निश्चित करणे. |

➤ विशेष नोंदणी अभियानाकरीता खालीलप्रमाणे लक्षांक निश्चित करण्यात आले.

| अ.क्र. | ठिकाण | अभियान नियंत्रण अधिकारी | नोंदणीचे लक्षांक |
|---|---|---|---|
| १. | मुंबई (MMR क्षेत्र) | श्री. अ.द. काकतकर, (अपर कामगार आयुक्त) श्रीम. एस.एस. लोखंडे, (कामगार उप आयुक्त) श्री. विश्राम देशपांडे(कामगार उप आयुक्त) , श्री. संभाजी व्हनाळकर(प्र. कामगार उप आयुक्त), श्री. अ.ल. डोके, (प्र. कामगार उप आयुक्त) | ७५,००० |
| २. | पुणे | श्री. अ.रा. लाकस्वार, अप्पर कामगार आयुक्त | ६५,००० |
| ३. | औरंगाबाद | श्री. एस.बी. पोळ, कामगार उप आयुक्त | २०,००० |
| ४. | नाशिक | श्री. जी.जे. दाभाडे, कामगार उप आयुक्त | ३०,००० |
| ५. | अमरावती | श्री. रा.मो. धुर्वे , प्र. सहाय्यक कामगार आयुक्त | २०,००० |
| ६. | नागपूर | श्री. वि.रा. पाणबुडे, अप्पर कामगार आयुक्त | ४०,००० |
| | एकूण | | २,५०,००० |

मंडळाच्या ठरावानुसारसामान्य प्रशासन विभागाच्या दि. १४.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये पॅनलवरील संस्थाच्या यादीतील नमूद संस्थाकडून प्रस्ताव मागवून छाननी अंती मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग प्रा.लि. पुणे यांचा प्रस्ताव शासनमान्यतेकरीता शासनास सादर करण्यात आलेला होता. शासनास सादर प्रस्तावात विशेष नोंदणी अभियानाकरीता आवश्यक खालील बाबींचा समावेश करण्यात आला होता.

| Sr.No. | Particulars | Qty | UoM | Rate | Sub total | GST Amt | Total Amt |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | A | B | C | D=AxBXC | E | F=D+E |
| १. | Registration Booth (Canopy) Designing, Printing and | १०६ size १८X६X ७ feet | Per No. | २२,५०० | २३,८५,०००० | ४,२९,३०० | २८,१४,३०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | supply of canopy with Backdrop Banner on flex with MS structure | | | | | | |
| २. | Tables with cover- one table cost for १ Month (५ per Registration Booth) Transportation charges for execution | ५३० | Per No. | १,७१० (each table cost for one minth) | ९,०६,३०० | १,६३,१३४ | १०,६९,४३४ |
| ३. | Chairs with Handle- one chair cost for १ month (५+१०+५ Extra= २० Per Reg. Booth) Transportation charges for execution | २१२० | Per No. | ७२० (each Chair cost for one minth) | १५,२६,४०० | २,७४,७५२ | १८,०१,१५२ |
| ४. | Designing, Pronting and supply of display panel at construction Sites Printed on flex with MS STAND (६ftX ४ft) (५ per Registration Booth) | ५३० | Per No. | १८९० | १०,०१,७०० | १,८०,३०६ | ११,८२,००६ |
| १. | **On Time Charge** Program Opening Ceremony (१०X२० Mandap with stage, | १ | Per location | १,५७,१८४ | १,५७,१८४ | २८,२९३ | १,८५,४७७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | carpet, Sound system, Backdrop, Podium with mike, sound and light arrangements, Chairs, Photography for १ day) | | | | | | |
| २. | e- Inaugration Opening ceremony with live streaming at ६ (४२" LCD Screen, Internet Connectivity, Electricity Supply and all other required items) | १ | Lump-sum | १४,४०,000 | १४,४०,000 | २,५९,२०० | १६,९९,२०० |
| ३. | Designing and Prepration and supply of Documentry film min.१० minute | १ | Per No. | ४,५६,००० | ४,५६,००० | ८२,०८० | ५,३८,०८० |
| ४. | Designing and Prepration and supply of Leaflets/ Brouchers (A५, ४ Color printing, both side,१०० gsm maplitho Paper) | ५००००० | Per no. | ७,२०,००० | ७,२०,००० | १,२९,६०० | ८,४९,६०० |
| ५. | Designing and Prepration of creatives for news paper | १ | Lump-Sum | ५०,००० | ५०,००० | ९,००० | ५९,००० |

अटल विश्वकर्मा सन्मान योजना- विशेष नोंदणी अभियानांतर्गत राज्यात ०६ ठिकाणी नोंदीत झालेल्या बांधकाम कामगारांचा नोंदणीचा तपशील व सदर अभियानाच्या अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव मंडळाच्या माहितीकरीता व मान्यतेकरीता सादर करण्यात येत आहे.

यावर मा. मंत्री महोदय (कामगार) तथा मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी व सर्व उपस्थितांनी झालेलया नोंदणीबाबत प्रशंसा केली. मा. मुख्यमंत्री महादेय यांच्या हस्ते नोंदणी अभियानाचा ई-शुभारंभ केल्यामुळे व अभियानाच्या प्रसार व प्रसिद्धीमुळे चांगल्या प्रकारे जनजागृती झालेली आहे व बांधकाम कामगारांकडून नोंदणीस चांगला प्रतिसाद मिळत आहे. असे मंडळ सदस्यांनी निदर्शनास आणले. तसेच, उर्वरित लक्षांक पूर्ण करण्यासाठी नोंदणी अभियानाचा कालावधी वाढविणे योग्य राहिल असे मत व्यक्त केले.

मा. उपसचिव (कामगार) यांनी अभियान कालावधीत अमरावती व नागपूर येथील दौऱ्याबाबत व बांधकाम कामागरांची नोंदणी करताना येणाऱ्या अडचणी विशेषता नागपूर येथे कामगांरानी मागील वर्षी ९०दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून दिले जात नाही याबाबत महानगरपालिका आयुक्तांशी चर्चाही करण्यात आली असे निदर्शनास आणले. तसेच मंडळ सचिव यांनीही अमरावती नागपूर व औरंगाबाद येथील दौऱ्याबाबतची माहिती मंडळास सादर करताना सांगितले की, नागपूर येथील नोदंणीतील ९० दिवसाचे प्रमाणपत्र दिले जात नसल्यासमुळे नोदंणी अभियानाची गती कमी झाल्याबाबत मा. जिल्हा अधिकारी यांची भेट घेवून महापालिकेतील अधिकाऱ्यांना प्रमाणपत्र देणेबाबत सुचना देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली होती, अमरावती जिल्हयातील मनरेगाच्या कामावरील बांधकाम कामागरांच्या नोंदणीबाबत कार्यवाहीच्या सुचना सहाय्यक कामगार आयुक्त यांना देण्यात आल्या. औरंगाबाद येथे विटभट्टयांवरील बांधकाम कामगारांची प्रत्यक्ष पाहणी केली असता नोदंणी अभियानास चांगला प्रतिसाद मिळत आहे. औरंगाबादमधील पाहणीत असेही निदर्शनास आले की, नोंदित बांधकाम कामगांनी हत्यारे व अवजारे खरेदी करीता केलेल्या मागण्यानुसार रु. ५०००/- एवढया अनुदानाची रक्कम बांधकाम कामगारांच्या खात्यात त्वरीत जमा केल्यामुळे नवीन बांधकाम कामगारांच्या नोंदणीस चांगला प्रतिसाद मिळत असल्याची बाब मंडळाच्या निदर्शनास आणली.

यावर मा. मंत्री महोदय (कामगार) तथा मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी राज्यात ०६ ठिकाणी सुरू असलेल्या अटल विश्वकर्मा सन्मान योजना- विशेष नोंदणी अभियान चांगल्या प्रकारे सुरु आहे. मा. मुख्यमंत्री महादेयांनी सर्व मा. आमदारांनाही नोंदणी अभियाना सहभागी होणेबाबत सुचना दिले असल्याची बाबही मंडळाच्या निदर्शनास आणली व सदर अभियानास १५ दिवसाची

मुदतवाढ देण्यात यावी, अशी सुचना केली. त्यास सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली. मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी सूचित केले की, ज्या जिल्ह्यामध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी पूर्ण झालेली आहे अथवा नोंदणीस कमी प्रतिसाद मिळत आहे अशा ठिकाणचे नोंदणी केंद्र त्याच जिल्हयातील जवळच्या तालूक्यात किंवा २१ प्रकारच्या बांधकामापैकी विविध कामावरील बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यासाठी अथवा अन्य जिल्हयात स्थलांतरीत करावे याबाबतचा निर्णय अभियान प्रमुखांनी घेणेबाबत सुचना देण्यात याव्यात.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: अटल विश्वकर्मा योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियानात दिंनाक २०.०३.२०१८ पर्यंत झालेल्या नोंदणीचे मंडळाकडून नोंद घेण्यात येत आहे. सदर विशेष नोदंणी अभियान कालावधीस दिनांक १०.०४.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. तसेच विशेष नोदंणी अभियानाकरीता विविध साहित्य व प्रमोटर्स च्या पुरवठ्याकरीता नेमण्यात आलेल्या मे. अँगल ॲडव्हटायझींग लि. पुणे या संस्थेच्या नियुक्तीस व विशेष नोंदणी अभियानावरील अंदाजित रु. ६ कोटीच्या खर्चास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**<br>**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **अध्यक्ष**<br>**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. ५: नोंदित बांधकाम कामगारांकरीता अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि. ०३.०९.२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये अशी चर्चा घडून आली की, केंद्र शासनाच्या दि.०९.०९.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत आदेशीत केलेले आहे. केवळ सोशल सिक्युरिटी योजनेंतर्गत अंतर्भूत नसणा-या १८ ते ४० वयोगटातील व आयकर प्रदाता नसणा-या बांधकाम कामगारांसाठी सदर योजना लागू करण्याचे निकष आहेत. तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी लाभार्थीचे वैध बचत खाते असणे, मोबाईल क्र. असणे अनिवार्य आहे.

प्रत्येक लाभधारकाच्या वयानुसार वैध बचत खात्यावर निर्धारित रक्कम वर्ग करणे, लाभधारकाचे बचत खाते वैध आहे, त्याचा मोबाईल क्र. तसेच लाभधारक आयकर प्रदात आहे किंवा नाही या बाबी तपासणे मंडळास मनुष्यबळाअभावी सद्यस्थितीत शक्य नाही. त्यामुळे मंडळाच्या कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित झाल्यानंतर सदर योजना राबविण्यात यावी, अशी चर्चा घडून आली व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

<u>**ठराव :**</u>मंडळाचे सध्या मॅन्युअल पध्दतीने चालू असलेले काम तसेच, कामाचा व्याप व उपलब्ध कर्मचारी संख्या विचारात घेता मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगार सोशल सिक्युरिटी योजनेंतर्गत अंतर्भुत आहेत किंवा नाहीत, आयकर प्रदाता आहेत किंवा नाहीत, तसेच त्यांचे बचत खात्याचा तपशील व मोबाईल क्रमांक इ. बाबी तपासणे मंडळास सध्या शक्य नाही. त्यामुळे मंडळाच्या कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित झाल्यानंतर सदर योजना राबविण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

तथापि मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांच्या समवेत दि. २२.०२.२०१७ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत विचार करण्याचे निदेश मा. मुख्य सचिव यांनी दिले आहेत. त्यानुसार ज्या नोंदीत पात्र बांधकाम कामगारांनी सदर योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी प्रिमियमची रक्कम अदा केलेली आहे, अशा कामगारांना सदर रक्कमेच्या किमान ५० % रक्कम प्रतिपूर्ती करणेबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे.

याबाबत मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखालील संपन्न बैठकीत यांनी नोंदित बांधकाम कामगारांना प्रति लाभार्थी रु. १०००/- इतकी पेन्शन मिळेल असे या योजनेचे स्वरूप असावे तसेच मंडळाकडे मोठया प्रमाणात निधी उपलब्ध असल्याने कामगार योगदानाची १००% रक्कमेची प्रतिपुर्ती मंडळामार्फत करण्यात यावी, असे सूचित केले. तसेच सदर योजनांतर्गत १८ ते ४० वयोगटातील कामगारांसाठी रु. १०००/- मासिक पेन्शन मिळणसाठी रु.४२/- ते रु.२९१/- इतकी रक्कम अदा करावी लागेल. त्यासाठी कामगाराकडून अर्ज, त्याने भरलेल्या प्रिमियमची बँकेची पावती व इतर आवश्यक कागदपत्रे घेवून प्रतिपुर्ती पध्दतीने सदर योजना लागु करण्यात यावी अशी चर्चा मंडळ बैठकीत घडून आली आहे.

**ठराव:** मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत रु.१०००/- प्रति लाभार्थी इतकी पेन्शन १००% प्रतिपुर्ती पध्दतीने लागु करणे व सदर योजनेसाठीचा प्रस्ताव शासनास पाठविणे व शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर सदर योजना बांधकाम कामगारांना लागू करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

तथापि, सदर ठरावानुसार अटल पेन्शन योजनेचा लाभ काही ठराविक कामगारानांच होत असल्यामुळे सदर योजना रु.५०००/- प्रति लाभार्थी इतकी पेन्शन १००% प्रतिपुर्ती पध्दतीने लागु करणेबाबत खालील पात्रतेच्या अनुषंगाने प्रस्तावित करण्यात येत आहे.

**सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी पात्रतेचे निकष खालील प्रमाणे आहेत.**

१. लाभधारकाचे बचत खाते वैध असावे.
२. वय वर्षे १८ ते ४० असणारा लाभधारक अटल पेन्शन योजनेंतर्गत लाभ घेऊ शकतो.
३. प्रत्येक लाभधारकाचा मोबाईल क्र. असणे आवश्यक आहे.
४. जे कामगार कर्मचारी पेन्शन योजना व ठेवीशी निगडीत विमा योजनेंतर्गत अंतर्भूत नसलेला लाभधारक अटल पेन्शन योजनेंतर्गत लाभ घेऊ शकतो.
५. आयकर प्रदाता नसलेल्या लाभधारक अटल पेन्शन योजनेंतर्गत लाभ घेऊ शकत नाही.

उक्त बाबींच्या अनुषंगाने अटल पेन्शन योजना रु.५०००/- प्रति लाभार्थी इतकी पेन्शन १००% प्रतिपुर्ती पध्दतीने लागु करणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी सदर पेन्शन योजना राबविण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा अंदाज तयार करावा अशी सूचना दिली. यावर मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, केंद्र शासनाने योजना जाहिर करताना बांधकाम कामगारांच्या वयानुसार निश्चित

केलेल्या दरमहा विमा हफ्याच्या रक्कमेनुसार योजनेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या बांधकाम कामगारांच्या संख्येनुसार खर्चाचा अंदाज घ्यावा लागेल. सदर योजना बँकामार्फत राबविण्यात येणार आहे. बांधकाम कामगारांच्या बँक खात्यामधून विमा हफ्याची रक्कम अदा केल्यानंतर अदा केल्यानंतर मंडळाकडून प्रतिपुर्ती करण्यात येईल. सदर योजना सुधारित पद्धतीने राबविण्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांना अटल पेन्शन योजना लागू करणेबाबत मंडळाच्या दिनांक२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर ठरावात बदल करून वय ६० वर्षे पुर्ण झाल्यानंतर प्रतिमाह रु. १०००/- ऐवजी रु. ५०००/- एवढे पेन्शन मिळेल या पद्धतीने अटल पेन्शन योजना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. केंद्र शासनाने योजना राबविण्यासाठी निर्धारित केलेल्या अटी शर्तीस अनुसरून योजना मंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ६: नोंदित बांधकाम कामगारांकरीता मध्यान्ह भोजन योजना लागू करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र राज्यात नोंदीत बांधकाम कामगारांपैकी मोठया प्रमाणावर बांधकाम कामगार अन्य राज्यातून स्थलांतरीत झालेले आहेत. तसेच ग्रामीण भागातूनही बरेच बांधकाम कामगार रोजगार मिळण्यासाठी शहरात येतात. सदर बांधकाम कामगारांकरीता बांधकामाच्या ठिकाणी निवासाची पुरेशी व्यवस्था नसते. तसेच, स्वयंपाक करणेही जिकरीचे ठरते. परिणामी आरोग्याचे व कुपोषणाचे प्रमाण दिसून येते व त्याचा परिणाम बांधकाम कामकाजावरही होतो. याबाबत विचार विनिमय करून दि.२८.०२.२०१७ व दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

**दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीचा ठराव :-** "बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजनेसाठी प्रथम शासनमान्य आय.टी कंसल्टंट KPMG यांची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या बचत गटांना/संस्थांना नियुक्त करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता."

**दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीचा ठराव :-**"नोंदित बांधकाम कामगारांसाठी प्रस्तावित मध्यान्ह भोजन योजना राबविण्यास मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. सदर योजना प्रथम टप्प्यात विभागीय स्तरावर राबविण्यात यावी. व सदर योजना राबविण्यासाठी विभागनिहाय अनुभवी स्वयंसेवी संस्था/ महिला बचत गट/ अन्य संस्थेची नेमणूक ई-निविदा पद्धतीने करावी, योजना अंमलबजावणीच्या देखरेखीसाठी कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांचेविभागनिहाय पाहणी पथकाची नेमणूक करावी. सदर योजनेस शासन मान्यता प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला."

मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ व दि.०६.०६.२०१७ रोजीच्या ठरावास अनुसरून महाराष्ट्र राज्यात नोंदीत जिवित बांधकाम कामगारांकरीता मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबत प्रस्ताव शासनास दि.२२.०६.२०१७ रोजी सादर करण्यात आलेला होता. परंतु, सदर प्रस्तावास अनुसरून काही मुद्यांवर माहिती सादर करणेबाबत दि.२९.०७.२०१७ व दि.१६.०८.२०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले होते. तसेच सदर योजनेस दि.१२.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

शासनामार्फत प्राप्त पत्राच्या अनुषंगाने मध्यान्ह भोजन योजना राबविण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव दि.१४.०२.२०१८ रोजी शासनास सादर करण्यात आला होता. तसेच, मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबतच्या योजनेच्या RFP डॉक्युमेंटस दि.२८.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेकरीता सादर करण्यात आलेले आहे. शासनाच्या दि.१२.०३.२०१८ रोजीच्या शासन

पत्रान्वये सदर योजना राबविण्याबाबत शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. (प्रत संलग्न) सदर योजनेच्या RFP डॉक्युमेंटसला शासन मान्यतेच्या अधिन राहून दि.१७.०३.२०१८ रोजीच्या देशपातळीवरील इंडियन एक्सप्रेस/ न्यू इंडियन एक्सप्रेस व राज्यस्तरावरील सकाळ या मराठी वर्तमानपत्रात राज्याच्या खालील तीन भागाकरीता ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ.क्र. | विभाग | प्रायोगिक तत्वावर जिल्हे | निविदा क्र. |
|---|---|---|---|
| १. | मुंबई | मुंबई, नवी मुंबई आणि औरंगाबाद विभाग | ई-निविदा क्र.०४/२०१८ |
| २. | ठाणे | नाशिक विभाग, कोकण विभाग (मुंबई व नवी मुंबई वगळून) | ई-निविदा क्र.०५/२०१८ |
| ३. | नागपूर | पुणे विभाग, अमरावती विभाग, नागपूर विभाग | ई-निविदा क्र.०६/२०१८ |

प्रस्तावित ई-निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **विषय** | दिनांक |
|---|---|---|
| **१.** | ई-निविदा डाऊनलोड करणे | १९.०३.२०१८ ते ०९.०४.२०१८ |
| **२.** | निविदापूर्व बैठक | २६.०३.२०१८ |
| **३.** | निविदा सादर करणे | ०९.०४.२०१८ |
| **४.** | निविदा उघडणे | ११.०४.२०१८ |

मध्यान्ह भोजन योजनेच्या कार्यन्वयानांकरीता खालीलप्रमाणे निविदा समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | | पद |
|---|---|---|
| १. | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| २. | उप सचिव, कामगार, मंत्रालय मुंबई | सदस्य |
| ३. | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | सदस्य |
| ४. | सहसंचालक, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५. | लेखाधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | सदस्य-सचिव |

मध्यान्ह भोजन योजनेस शासन मान्यता प्राप्त झाली असून मंडळामार्फत करण्यात येत असलेली उपरोक्त कार्यवाही मंडळाच्या माहितीकरीता सादर करण्यात येत आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांकरीता मध्यान्ह भोजन योजना लागू करण्यास शासन स्तरावरुन प्रदान करण्यात आलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात येत आहे. सदर मान्यतेस अनुसरून मंडळ स्तरावरून केलेल्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. निविदा प्रक्रीया पुर्ण करुन संस्था निश्चिती व दरस्वीकृतीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ७: मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी व योजनांच्या प्रसिद्धीकरीता जाहिरातीच्या सुधारित आराखड्यास मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.१५.०९.२०१७ पत्राअन्वये कामगार विभागातील विविध योजनांच्या जनजागृतीसाठी त्या क्षेत्रात काम करणाऱ्या एजन्सीचे Empanelment करावे, तसेच जनजागृतीचा एकत्रित वार्षिक आराखडा सादर करावा असे निर्देश प्राप्त झाले होते.

त्यानुसार मंडळाने दि.१६.१२.२०१७ रोजी विविध योजनांच्या जनजागृतीसाठी रू.२५.०६ कोटीचा वार्षिक आराखडा शासनास मंजुरीकरिता सादर करण्यात आला होता व सदर आराखड्यास मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०४.०१.२०१८ च्या पत्रान्वये जाहिरातींची कार्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनयामार्फत करण्यात यावी, असे निर्देश देण्यात शासनाद्वारे प्राप्त झाले आहेत.

मंडळाच्या मान्यतेने सादर केलेल्या रू.२५.०६ कोटीच्या आराखड्यास शासनाने दि. ९.०२. २०१८ च्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच त्यातील समाविष्ट माध्यमाच्या एकल स्त्रोत जाहिराती संस्था निश्चिती बाबत दि. ९.०२. २०१८ पत्राद्वारे कार्यालयास कळविण्यात आले असुन माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | जाहिरातीचे माध्यम | संस्थेचे नाव | रक्कम | शासन मान्यतेचे पत्र |
|---|---|---|---|---|
| १ | LED Van for promotion & others | मे. एंजल Advertisement | ४.११ कोटी | दि. ९.०२. २०१८ |
| २ | Hoarding on BEST & MSRTC Buses | मे.राकेश Advertisement | ६.५० कोटी | दि. ९.०२. २०१८ |
| ३ | MSRTC Bus stand announcement | मे. व्रीत्ती सोलुशन | २.५० कोटी | दि. ९.०२. २०१८ |

त्याअन्वये वरील जाहिराती संस्था निश्चिती बाबत पत्रांच्या आधीन राहून मे. एंजल Advertisement सोबत दि.१४.०२.२०१८ रोजी करार करण्यात आला असून सदर संस्थेचे पूरवठा आदेश देण्यात आले. तसेच मे.राकेश Advertisement आणि मे. व्रीत्ती सोलुशन सोबत करार करण्याचे काम अंतिम टप्प्यात सुरु आहे.

उपरोक्त मान्यताप्राप्त आराखड्याला शासनाद्वारे काही बदल करून सुधारित आराखडा या कार्यालयास कळविण्यात आला आहे.

त्याअन्वये सदर रु.२५.०६ कोटीच्या च्या सुधारित आराखड्यास मंडळाची मंजुरी मिळण्याकरिता सादर करण्यात येत आहे.

**Publicity and Awareness of MBOCWW Board welfare schemes (Rupees in Crore)**

| Sr No. | MBOCWW Board, Mumbai | Total Exposures | Original | Revised |
|---|---|---|---|---|
| 1 | Hoarding on BEST Panels | As per rate applicable-DAVP | 2.00 | 2.00 |
| 2 | Hoarding on MSRTC Panels | As per rate applicable-DAVP | 4.50 | 4.50 |
| 3 | MSRTC announcements at Bus Stands | As per rate applicable | 2.50 | 2.50 |
| 4 | Public Relation Campaign | 2.5 Lac per month retainer fee/12 months | 0.30 | 0.30 |
| 5 | Documentary Production | 1 Film of 5 minutes as per DGIPR RATE | 0.10 | 0.10 |
| 6 | Case Study Films Production | 4 Films of 5 minutes as per DGIPR RATE | 0.20 | 0.20 |
| 7 | Radio Spot & Jingle Production | 16 Radio spots of 60 seconds-Category B DGIPR rate | 0.16 | 0.16 |
| 8 | Poster and Newspaper Design | 20 Newspaper ads of size quarter page-Cat B DGIPR rate | 0.05 | 0.05 |
| 9 | LED Van for Promotion | 20 Van | 1.00 | 1.00 |
| 10 | IVR Campaign | As per requirements | 0.15 | 0.15 |
| 11 | Print | 1540 ads/QP-Releases as per DGIPR Rates | 1.25 | 1.25 |
| 12 | TV Media | 1625 Spots/30 Sec.-Releases as per DAVP rates | 1.00 | 1.00 |
| 13 | Radio | 32550 Spots/30 Sec. as per DAVP rates | **2.00** | **0.50** |
| 14 | MSRTC Hoardings | 1150 sites as per approved rates | 1.50 | 1.50 |
| 15 | TV Creative Production | 8 TVC of 60 seconds as per Category B DGIPR rate | 0.60 | 0.60 |
| 16 | Creative adaptations & Booklet Designing | As per requirement | 0.10 | 0.10 |
| 17 | Street Play in 36 District Talukas | 880 Shows | 0.88 | 0.88 |
| 18 | Digital Wall Painting | 10000 sq.ft. | 0.25 | 0.25 |
| 19 | Labour Mealava in Revenue region | 12 Melava | 1.02 | 1.02 |

**विषय क्र. ८: नोंदित बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या कौशल्य वृद्धीकरण योजना (RPL) प्रशिक्षणाचा आढावा घेणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, राज्यातील विविध उद्योगांना कुशल मनुष्य बळाचा पुरवठा व्हावा या हेतुने केंद्र शासनाने राज्यातील नोंदित बांधकाम कामगारांकरीता कौशल्यवृध्दी योजना (Recognition of Prior Lerning) लागु केली आहे. केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनिमय व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ६० अन्वये केंद्र शासनाच्या Director General Employment & Training (DGET) ने माहे डिसेंबर २०१४ मध्ये Operation Manual तयार करून त्या द्वारे मार्गदर्शक तत्वे निश्चित करून त्याची अंमलबजावणी करण्याबाबत राज्यांना कळविले आहे.

केंद्र शासनाच्या पॅनल वरील खालील संस्थांना असेसिंग बॉडी व ट्रेनिंग प्रोव्हायडर म्हणून नियुक्त करण्यांत आले आहे.

| अनु क्र. | ट्रेनिंग प्रोव्हायडर्सची नावे |
|---|---|
| १ | आय एल ॲण्ड एफ स्किल्स |
| २ | भास्कर फाऊंडेशन |
| ३ | लेबरनेट सर्विस इंडिया प्रा. लि. |
| ४ | सुशिल बहुउद्येशिय शिक्षण संस्था |
| ५ | जी ॲण्ड जी स्किल्स |

| अनु क्र. | असेसिंग बॉडिजची नावे |
|---|---|
| १ | ए के जी स्किल्स प्रा. लि. |
| २ | इंजिनियरिंग स्टाफ कॉलेज ऑफ इंडिया |
| ३ | नवरिती टेक्नोलॉजिस प्रा. लि. |
| ४ | व्हर्चुअल एज्युकेशन ट्रस्ट |
| ५ | इंडिया स्किल्स प्रा.लि. |

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दि.०३.०१.२०१८ रोजी बैठक होवून त्यामध्ये खालील बाबी ठरावात मंजूर करण्यांत आल्या.

१. ट्रेनिंग प्रोव्हायडर्स संस्थासोबत दि.१६.०३.२०१७ रोजी करण्यांत आलेल्या सामंजस्य करार (MOU) मध्ये सुधारणा करुन केंद्र शासनाच्या माहे डिसेंबर 2014 मधील मॅन्युअल मधील मुददा क्र.९.६ (b) अन्वये सन २०१७-१८ या चालू वित्तिय वर्षाकरीता देय प्रशिक्षणाची प्रति तास रु.३५/- प्रमाणे प्रशिक्षण खर्च व आगामी वर्षाच्या 1 एप्रिल पासून वार्षिक वाढ रु.२.५० प्रमाणे मंजूर करावी.

२. केंद्र शासनाच्या माहे डिसेंबर २०१४ च्या मॅन्युअल मधील मुद्या क्र. ९.६ (e) अन्वये मंजुर दराने केंद्र शासनाच्या पॅनलवरील ९ संस्थांपैकि मंडळाने प्रस्तावित केलेले व शासनाच्या दि. ०४.१२.२०१७ च्या पत्रान्वये RDAT, Mumbai यांच्याकडे शिफारस केलेल्या ५ असेसिंग बॉडिज सोबत सामंजस्य् करार (MOU) करणे.

३. केंद्र शासनाच्या माहे डिसेंबर २०१४ च्या मॅन्युअल मधील मुद्या क्र. ९.६ (C ) अन्वये मंजुर दराने प्रति प्रशिक्षणार्थी प्रति तास रु. ३५ या दराने देय वेतन नुकसान भरपाई (Compansation Wage Loss) जिल्हा कार्यालयामार्फत संबंधित बांधकाम कामगारांना अदा करणे.

४. २०० बांधकाम कामगारांपेक्षा कमी बांधकाम कामगार असलेल्या बांधकामाच्या ठिंकाणाकरीता स्वंतंत्र प्रशिक्षण केंद्र स्थापन करुन जिल्हा कार्यालयाने मंजुर केलेल्या यादीतील बांधकाम कामगारांना RPL प्रशिक्षण देणे.

सदर ठरावानूसार उपरोल्लेखित ट्रेनिंग प्रोव्हायडर्स आणि असेसिंग बॉडीज यांच्याबरोबर मंडळाने दि. २६.०२.२०१८ रोजी सांमजस्य् करार (MOU) करण्यांत आला. ठरावातील मुददा क्र.३ व ४ नुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना मंडळाच्या दि.१४.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सुचना देण्यांत आल्या आहेत. तसेच प्रशिक्षण खर्चा बाबतची देयके प्रदानापूर्वी तपासून अप्पर कामगार अधिकारी / कामगार उपायुक्त यांनी शिफारस करण्याबाबत कळविण्यांत आले आहे.

ट्रेनिंग प्रोव्हायडर्स आणि असेसिंग बॉडीज यांनी दि. १६.०३.२०१८ पर्यंत दिलेल्या प्रशिक्षणाची स्थिती सादर करण्यात आली त्यानुसार माहे एप्रिल २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या दरम्यान झालेल्या RPL प्रशिक्षणाची स्थिती खालीलप्रमाणे सादर करण्यात आली.

| अ.क्र. | बाब | संख्या |
|---|---|---|
| १. | प्रशिक्षणाकरीता सादर बांधकाम ठीकाणे | ९६१ |
| २. | प्रशिक्षणाकरीता मंजूर बांधकाम ठीकाणे | ९०४ |
| ३. | प्रशिक्षाणाकररता अपलोड बॅचेसची संख्या | १०७९ |

| | | |
|---|---|---|
| ४. | प्रशिक्षणाकरीता अपलोड लाभार्थी संख्या | ३२०४४ |
| ५. | प्री-असेसमेंट झालेल्या बॅचेस | ८३५ |
| ६. | प्री-असेसमेंट झालेले लाभार्थी | २४१०३ |
| ७ | प्रशिक्षण पुर्ण झालेल्या बॅचेस | ९२९ |
| ८ | प्रशिक्षण पुर्ण लाभार्थी | १५७२९ |
| ९ | प्रशिक्षण प्रगतीपथावर असेलेले बॅचेस | २९४ |
| १०. | प्रशिक्षण प्रगतीपथावर असलेले लाभार्थी | ८५३० |
| ११ | प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र निर्गमित बॅचेस | ३२ |
| १२ | प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र निर्गमित लाभार्थी | ६६४ |

उपरोक्त RPL प्रशिक्षणाच्या स्थितीबाबत सविस्तर चर्चा झाली. सदर स्थितीचा आढावा घेतल्यानंतर मा. मंत्री महोदय (कामगार) तथा मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी प्रशिक्षणाची प्रगती समाधानकारक नाही, अशी खंत व्यक्त केली व केंद्र शासनाच्या पॅनलवरील ट्रेनिंग प्रोव्हायर्डस व असेसिंग बॉडी करीत असलेल्या प्रशिक्षणाशिवाय राज्य शासनाच्या MSSDS या संस्थेकडूनही RPL चे प्रशिक्षण देणे योग्य राहील असे मत व्यक्त केले.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या कौशल्य वृद्धीकरण योजना (RPL) प्रशिक्षणाचा माहे एप्रिल २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत झालेल्या प्रशिक्षणाची मंडळाने नोंद घेतली. RPL प्रशिक्षणाची गती वाढविण्यासाठी केंद्र शासनाच्या पॅनलवरील मंडळाने नियूक्त ट्रेनिंग प्रोव्हायडर्स व असेसिंग बॉडीशिवाय राज्य शासनाचे SCVT (State Concil for Vocational Training) ने मान्यता दिलेल्या संस्थेकडून सुद्धा कामगारांचे ट्रेनिंग व असेसिंग करून घेण्यात यावे. सदर संस्थेकडून RPL प्रशिक्षणाबाबत प्रस्ताव प्राप्त करून शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ९: मंडळाच्या मुख्यालयासाठी तसेच जिल्हा कार्यालयासाठी लागणारी पावती पुस्तके, ओळखपत्र, इत्यादीच्या छपाईकरीता दरस्वीकृती व संस्था निश्चितीस मंडळाची मान्यता प्रदान करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाच्या मुख्यालयासाठी तसेच जिल्हा कार्यालयासाठी लागणारी पावती पुस्तके, नोंदणी फॉर्म, नोंदणी शुल्क पावती,ओळखपत्र, इत्यादीसाठी ई- निविदा मागवून छपाई करुन घेण्यासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक०३.०१.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत विषय क्र. १७.३ अन्वये खालील ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

**ठराव:** मंडळाच्या मुख्यालयासाठी तसेच जिल्हा कार्यालयासाठी लागणाऱ्या प्रस्तावित छपाई ई-निविदा मागवून करण्यास व त्यासाठी रु. २.५० कोटी (कर वगळून) एवढ्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

मंडळाच्या मंजुर ठरावानुसार छपाई संख्या व दर निश्चिती करुन मे. केपीएमजी यांच्याकडून निविदा प्रारुप तयार करण्यात आला.

सदर निविदा "लोकमत" या राज्यस्तरावरील व "प्रहार" या प्रादेशिक स्तरावरील दैनिक वृत्तपत्रात दि.१५.०१.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली. तसेच www.mahatenders.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. या निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे ठरविण्यात आले होते.

| अनु. क्र. | विषय | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा डाऊनलोड करणे | दि. १५.०१.२०१८<br>ते दि. २५.०१.२०१८ | दुपारी १२.३० पासून<br>दुपारी ३.०० पर्यंत |
| २ | निविदा पुर्व बैठक | दि. १९.०१.२०१८ | दुपारी ३.०० पासुन |
| ३ | निविदा सादर करणे | दि.२५.०१.२०१८ | दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| ४ | निविदा उघडणे | दि. ३०.०१.२०१८ | सकाळी ११.३० वाजता |

वरीलप्रमाणे, दि. १९.०१.२०१८ रोजी निविदा पुर्व बैठक घेण्यात आली. त्यावेळी झालेल्या चर्चेनूसार दि. २३.०१.२०१८ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आली. निविदा सादर करण्याचे अंतिम दिनांक २५.०१.२०१८ पर्यंत निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने निविदा सादर करण्यास प्रथमत: दि ०३.०२.२०१८ व नंतर दि.०८.०२.२०१८ व दि. १२.०२.२०१८ रोजीपर्यंत एकुण तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली व दि. १४.०२.२०१८ रोजी सादर निविदा उघडण्यात आल्या.

दि. १४.०२.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त् झाल्या.

| अनु. क्र. | निविदाकार |
|---|---|
| १ | मे. श्री स्टार कंपनी |
| २ | मे.सनराज प्रिंट पॅक इंडस्ट्रीज. |
| ३ | मे. भास्कर इंडस्ट्रीज |

सदर निविदा दि. १४.०२.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता तीन उपस्थित निविदाकारांसमक्ष उघडण्यात आल्या.

तांत्रिक निविदांची छाननी मे. केपीएमजी या आय टी कन्सल्टंट सल्लागार संस्थेच्या सल्लागारांकडुन करून घेण्यात आली. मे. केपीएमजी यांनी सदर अहवालानूसार तीनही निविदाकारांनी सादर न केलेली आवश्यक कागदपत्रे दि. १५.०२.२०१८ पर्यंत सादर करण्याविषयी दि. १४.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. तथापि मे. भास्कर इंडस्ट्रीज यांनी ISO 9001 Certificate सादर न केल्याने त्यांना पुन्हा दि. १६.०२.२०१८ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत सादर करण्याचे मेलद्वारे कळविण्यात आले. तथापि, ते त्यांनी सादर केलेले नाही. एकुण तीन निविदांपैकी एक निविदा अपात्र ठरल्याने २ निविदाकारांच्या वित्तीय निविदा दि. १६.०२.२०१८ रोजी दुपारी २.४५ वाजता मे. श्री स्टार कंपनी आणि मे. सनराज प्रिंट पॅक इंडस्ट्रीज यांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आल्या. सदर निविदाकारांनी सादर दराचा तपशिल पुढीलप्रमाणे :

| अनु क्र. | छपाईचा तपशिल | वार्षिक छपाईचे अंदाजित संख्या | मे. श्री स्टार कंपनी | | मे. सनराज प्रिंट पॅक इंडस्ट्रीज. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | छपाईचा दर | प्राप्त् निविदेची एकुण रक्कम (वस्तू व सेवा कर सह) रक्कम रु. | छपाई चा दर | प्राप्त् निविदेची एकुण रक्कम (वस्तू व सेवा कर सह) रक्कम रु. |
| १ | बांधकाम कामगारांची ओळखपत्रे. | ४,००,००० | ८.७५ | ४१,३०,०००.०० | ४५.४० | २,०३,४०,०००.०० |
| २ | माहिती पुस्तिका | ४,००,००० | ४०.५० | १,९१,१६,०००.०० | ५८.७० | २,६३,००,०००.० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ० |
| ३ | पावती पुस्तके (१०० पावत्यांचे १ पुस्तक) | ४,००० | १००.०० | ४,७२,०००.०० | ६९.४० | ३,१०,९२०.०० |
| ४ | नोंदणी फॉर्म (३ पानांचा १ फॉर्म) | ४,००,००० | १.३५ | ६,३७,०००.०० | १.९६ | ८,८०,०००.०० |
| ५ | लेटर हेड (१००पानांचे १ पुस्तक) मराठी/इंग्रजी | १० | ५७०.०० | ६,७२६.०० | ३२० | ३,७७६.०० |
| ६ | फाईल्स् कव्हर | ६०० | ७१.५० | ५०,६२२.०० | २४ | १६,९९२.०० |
| ७ | मिटींग फोल्डर | ७०० | ७२.०० | ५९,४७२.०० | ३२ | २६,४३२.०० |
| ८ | मिटींग पॅड | ४०० | २८.०० | १३,२१६.०० | ३६ | १६,९९२.०० |
| ९ | व्हाउचर बुक(१०० पावत्यांचे १ पुस्तक) | १० | १४१.५० | १६७०.०० | ८० | ९४४.०० |
| १० | राईटींग पॅड | १०० | ७५.०० | ८,८५०.०० | ५६ | ६,६०८.०० |
| ११ | अधिकारी/कर्मचारी ओळखपत्र | ६० | ६०.०० | ४,२४४.०० | १२० | ८,४९६.०० |
| | **एकुण रक्कम** | | | **२,४५,००,०००.००** | | **४,७९,११,१६०.००** |

वरील प्रमाणे मे. श्री स्टार कंपनी यांची रु. २,४५,००,०००/- (वस्तू व सेवा कर सह) ची निविदा न्यूनतम असल्याने त्यांची निविदा स्विकृत केल्याविषयी मंडळाकडून दि.२८.०२.२०१८ च्या पत्रान्वये त्यांना कळविण्यात आले आहे. मे. श्री स्टार कंपनीने रु. ७.३५ लक्ष रकमेची सुरक्षा अनामत बँक हमी स्वरुपात मंडळाकडे जमा केल्यानंतर करारनामा करून घेण्यात येईल.

मंडळाच्या मुख्यालयासाठी तसेच जिल्हा कार्यालयासाठी लागणारी पावती पुस्तके, ओळखपत्र, इत्यादीच्या छपाईकरीता मे. श्री स्टार कंपनी यांचे रु. २,४५,००,०००/- (वस्तू व सेवा कर सह) दर स्विकृतीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. मंडळाच्या मान्यतेनुसार प्रस्तावित छपाईचे आदेश देण्यात येतील.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या मुख्यालयासाठी तसेच जिल्हा कार्यालयासाठी लागणारी पावती पुस्तके, ओळखपत्र, इत्यादीच्या छपाईबाबत मंडळाच्या ठरावानुसार ई-निविदा पद्धतीने संस्था व दर निश्चितीबाबत करण्यात आलेली कार्यवाही, मे. श्री स्टार कंपनी या न्यूनत्तम दर असलेल्या संस्थेची निवड, प्राप्त न्यूनत्तम दर व त्यानूसार अपेक्षित खर्च रु. २,४५,००,०००/- (वस्तू व सेवा कर सह) चा प्रस्ताव स्वीकृत करण्यात येत आहे. मे. श्री स्टार कंपनी या संस्थेस छपाईचे आदेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. १०: मंडळाच्या संपूर्ण कामकाजाबाबत एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित करणेबाबत HPC च्या मान्यतेस अनुसरून मंडळाने केलेल्या कार्यवाहीबाबत मंडळास अवगत करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी मंडळाचे कामकाज व गरजा हाताळण्यासाठी मंडळात स्वत:चे आस्थापनेवर पूर्ण वेळ कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचा अभाव आणि हिशोब व लेख्यांवर अंतर्गत नियंत्रण ठेवण्यासाठी अतिशय अपुरी प्रणाली ही मंडळाच्या प्रशासकीय अक्षमतेची कारणे असल्याचे आपल्या क्षेत्रिय लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेले आहे.

सबब, मंडळाने यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी मंडळाच्या एकात्मिक कामकाजाचा अंतर्भाव असणारे एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली विकसीत करण्याचे सुनिश्चित केलेले आहे.

मंडळाच्या दि.३०.०७.२०१४, दि.२६.०८.२०१५ व दि.०१.१०.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये बांधकाम कामगार नोंदणीसाठी आवश्यक माहिती कागदपत्रे जमा करण्यासाठी बाहय यंत्रणेची नियुक्ती करण्याचा ठराव घेण्यात आलेला आहे. तसेच मंडळाच्या दि.०१.१०.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीतील विषय क्र.०३ अन्वये व दिनांक ०२.११.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीतील विषय क्र.०५ अन्वये मे. अर्न्स्ट अँड यंग एल पी.पी. या कंपनीच्या ०१ सिनिअर कन्सल्टंट व ०१ कन्सल्टंटची सदर कामाचे RFP डॉक्युमेंटस तयार करण्यासाठी नियुक्ती करण्यात आलेली होती, सदर संस्थेने तयार केलेल्या RFP डॉक्युमेंटसनुसार HPC च्या मान्यतेअंती माहिती व तंत्रज्ञान विभागातील राबविली जाणारी निविदा प्रक्रिया कामगार विभागामार्फत रद्द करण्यात आलेली आहे व मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मे. केपीएमजी या संस्थेची मंडळाने सल्लगार म्हणून नेमणूक करण्यात आली व त्यांना RFP डॉक्युमेंटस तयार करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

मे. केपीएमजी यांनी तयार केलेले प्रारूप RFP Document बाबत मा.प्रधान सचिव कामगार विभाग, मा. कामगार आयुक्त व मा. विकास आयुक्त, असंघटीत कामगार यांची संयुक्त बैठक मा. प्रधान सचिव यांचे दालनात दि.०२.०६.२०१७ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत प्रारूप RFP Document मध्ये काही बदल करावयाचे ठरले. सदर बदलानुसार सुधारित RFP Document तयार करून दि. ०६.०६.२०१७ रोजीच्या मंडळाच्या बैठकीमध्ये मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

ठराव:बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटित कामगार मंडळ यांचे दोन वेगवेगळे सुविधा केंद्र स्थापन करण्याऐवजी एकच सुविधा केंद्र स्थापन करावे. सदर सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी स्वतंत्र संस्थेची नेमणूक करण्यात यावी. कार्यालयाची स्थापना व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठीच्या RFP Document मध्ये उपरोक्त बाबींचा समावेश करुन शासन मान्यतेस लवकरात लवकर सादर करण्यात यावा. तसेच, सुधारित आकृतीबंध तयार करून शासन मान्यतेस पाठविण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने शासनास कार्यालयाची स्थापना व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठीच्या दोन वेगवेगळया RFP Document शासन मान्यतेकरीता सादर करण्यात आलेल्या होत्या. कामगार विभागामार्फत दि. १८.०१.२०१८ रोजी मा. मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न उच्चाधिकार समितीच्या (HPC) बैठकीत विषय सादर करण्यात आला असून त्यास HPC ची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने शासनाने दि.०७.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मंडळाच्या संपूर्ण कामकाजाचा अंतर्भाव असणारी एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणालीची अंमलबजावणी, संचालन व देखभालीकरीता व्यवस्थापन सेवा प्रदात्याच्या (Management Service Provider) निवडी संदर्भात तयार करण्यात आलेल्या RFP ला मान्यता देण्यात आलेली आहे.

शासन मान्यतेनुसार मंडळाच्या संपूर्ण कामकाजाबाबत एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित करणेबाबतच्या ई-निविदेची जाहिरात प्रसिध्दीकरीता दि. २०.०२.२०१८ रोजी एक राष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी या वृत्तपत्रात (इंडियन एक्सप्रेस) मध्ये व एक राज्यस्तरीय मराठी (लोकमत) या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

वरील कार्यवाहीच्या अनुषंगाने खालील तपशिलानुसार mahatenders.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदेबाबत डॉक्युमेंटस अपलोड करण्यात आले होते, ई-निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विषय | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | ई-निविदा डाऊनलोड करणे | दि.२०.०२.२०१८ | स. ११.३० ते |
| | | ते१५.०३.२०१८ | दुपारी ३.०० पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | निविदा पूर्व बैठक | दि. २७.०२.२०१८ | स. ११.३०वा. |
| ३. | निविदा सादर करणे | दि. १५.०३.२०१८ | दुपारी ३.००पर्यंत |
| ४. | निविदा उघडणे | दि. १९.०३.२०१८ | सकाळी ११.३० वा. |

सदर ई-निविदेबाबतच्या कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे मा. कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

| अ.क्र. | समितीतील सदस्य | पद |
|---|---|---|
| १. | मा. कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई | मा. अध्यक्ष |
| २. | मा. उपसचिव (कामगार) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ३. | मा. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, मवइबाककमं, मुंबई | सदस्य |
| ४. | मा.सहसंचालक उद्योग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५. | लेखाअधिकारी, मवइबाककमं, मुंबई | सदस्य-सचिव |

उपरोक्त वेळापत्रकानूसार एकात्मिक संगणक प्रणाली विकसीत करणेबाबत दि. २७.०२.२०१८ सकाळी ११.३० वा. निविदा पुर्व बैठक आयोजित करण्यात आली होती ई-निविदेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या २१ संस्थानी निविदा पूर्व बैठकीत सहभाग घेतला, सदर संस्थानी Tenders Doucument मध्ये सुधारणात्मक मुद्दे उपस्थित केले होते, सदर मुद्याबाबत ई-निविदेच्या मसुद्यामध्ये आवश्यक बदल व सुधारणा करण्यासाठी मंडळाची सल्लागार कंपनी मे. केपीएमजी यांना पुढील कार्यवाहीस्त्व देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने वरील सुचनाबाबत कार्यवाही सुरू आहे. सदर ई-निविदेला दि. ०६.०४.२०१८ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

निविदापुर्व बैठकीत इच्छुक निविदाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना अनुसरुन खालीलप्रमाणे महत्वाचे बदल ई-निविदा अटी-शर्तीमध्ये करणे प्रस्तावित आहे.

१. देयाकांची अदायगी- दर तिमाही ऐवजी दरमहा करणे.

२. अटल विश्वकर्मा योजनेअंतर्गत प्रगतीपथावरील विशेष नोंदणी अभियानातील बांधकाम कामगारांच्या नोंदणीस मिळणारा प्रतिसाद विचारात घेता प्रस्तावित निविदेतील नोंदणीचे प्रतिवर्ष लक्षांक ६ लक्ष ऐवजी २ लक्ष करणे.
३. ई-निविदेच्या अंदाजपत्रकात जिल्हा व प्रादेशिक कार्यालयाकरीता आवश्यक स्टेशनरी चा समावेश करण्यात आलेला नाही. तथापि, कार्यालयीन उपयोगाच्या स्टेशनरीचे दर प्राप्त करणे प्रस्तावित आहे. प्राप्त दरानुसार संबंधित संस्थेकडून स्टेशनरी घ्यावयाची किंवा स्वतंत्ररित्या निविदा प्रक्रीयेचा अंवलंब करून कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करावी याबाबतचा अंतिम निर्णय मंडळाचा राहिल.
४. IWBMS प्रणाली राबविण्यासाठी येणार खर्च व मनुष्यबळाचा खर्च याबाबतचा तपशिल स्वतंत्र प्रपत्रात मागविणे.
५. विद्युत देयके, दुरध्वनी देयके, पाणीपुरवठा देयके, स्थानिक कर इत्यादी देयकांची प्रतिपुर्ती मंडळाकडून करण्यात येईल तथापि, इंटरनेट कनेक्टीव्हीटी चा खर्च नियुक्त संस्थेस करावा लागेल.
६. निविदेच्या प्रतिसादात वाढ व्हावी याकरीता इच्छुक निविदाकारांनी केलेल्या विनंतीनुसार इसारा अनामत रक्कम रु. ७० लक्ष ऐवजी रु. ३५ लक्ष करणे.
७. निविदाकारांची मागील ३ वर्षातील वार्षिक उलाढाल रु. १२५ ऐवजी रु. १०० कोटी करणे व consortium असल्यास लिड बिडरची मागील ३ वर्षाची उलाढाल कमात कमी ८० कोटी आणि consortium partner ची मागील ३ वर्षाची उलाढाल कमीत कमी २० कोटी एवढी असावी.
८. इच्छुक निविदाकार किंवा consortium असल्यास कोणत्याही एका पार्टनर कडे मागील ७ वर्षात रु. ५० कोटी एवढया रक्कमेचा कमीत कमी एक प्रकल्प पुर्ण केल्याचा अनुभव असावा.
९. इच्छुक निविदा किंवा consortium असल्यास कोणत्याही एका पार्टनरकडे मागील ७ वर्षात कमीत कमी २५ ठिकाणी मनुष्यबळ पुरवठा केल्याचा अनुभव असावा.
१०. इच्छुक निविदा किंवा consortium असल्यास कोणत्याही एका पार्टनरकडे मागील ७ वर्षात कमीत कमी २५ कोटी एवढया रक्कमेचे फॅसिलिटेशन मॅनेजमेंट सर्विसेस/ आय टी हार्डवेअर सप्लायचा अनुभव असावा.
११. पुरवठा आदेश दिल्यानंतर १०% मोबीलायझेयान ॲडव्हान्स देणे व सदर अग्रीमाची वसूली पुढील ३ वर्षाच्या मासिक देयकातून करणे.

१२. नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा बायोमॅट्रीक डाटा संस्थेकडे स्टोर न करता आधार कार्डशी लिंक करणे.

प्रस्तावित निविदेच्या निविदापुर्व बैठकीत इच्छूक निविदाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यास अनुसरुन करावयाच्या उपरोक्त बदलाबाबत मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या संपूर्ण कामकाजाबाबत एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित करणेबाबत HPC च्या मान्यतेस अनुसरून मंडळाने केलेल्या कार्यवाहीस व निविदेस प्रतिसाद वाढविण्याकरीता इच्छुक निविदाकारांच्या मागणीस अनुसरुन निविदेच्या अटी शर्तीमध्ये करावयाच्या प्रस्तावित बदलास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, त्यानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करून दर स्वीकृत व संस्था निश्चितीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. ११: महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटीत कामगार मंडळ या दोन्ही मंडळामार्फत बांधकाम कामगार/ असंघटीत कामगारांची नोंदणी व कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत HPC च्या मान्यतेस अनुसरून मंडळाने केलेल्या कार्यवाहीबाबत मंडळास अवगत करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी मंडळाचे कामकाज व गरजा हाताळण्यासाठी मंडळात स्वत:चे आस्थापनेवर पूर्ण वेळ कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचा अभाव आणि हिशोब व लेख्यांवर अंतर्गत नियंत्रण ठेवण्यासाठी अतिशय अपुरी प्रणाली ही मंडळाच्या प्रशासकीय अक्षमतेची कारणे असल्याचे आपल्या क्षेत्रिय लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेले आहे.

सबब, मंडळाने यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी मंडळाच्या एकात्मिक कामकाजाचा अंतर्भाव असणारे एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली विकसीत करण्याचे सुनिश्चित केलेले आहे.

मंडळाच्या दि.३०.०७.२०१४, दि.२६.०८.२०१५ व दि.०१.१०.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये बांधकाम कामगार नोंदणीसाठी आवश्यक माहिती कागदपत्रे जमा करण्यासाठी बाहय यंत्रणेची नियुक्ती करण्याचा ठराव घेण्यात आलेला आहे. तसेच मंडळाच्या दि.०१.१०.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीतील विषय क्र.०३ अन्वये व दिनांक ०२.११.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीतील विषय क्र.०५ अन्वये मे. अर्न्स्ट अँड यंग एल पी.पी. या कंपनीच्या ०१ सिनिअर कन्सल्टंट व ०१ कन्सल्टंटची सदर कामाचे RFP डॉक्युमेंटस तयार करण्यासाठी नियुक्ती करण्यात आलेली होती. सदर संस्थेने तयार केलेल्या RFP डॉक्युमेंटसनुसार HPC च्या मान्यतेअंती माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत राबविली जाणारी निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली आहे व व मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मे. केपीएमजी या संस्थेची मंडळाने सल्लगार म्हणून नेमणूक करण्यात आली व त्यांना RFP डॉक्युमेंटस तयार करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

मे.केपीएमजी यांनी तयार केलेले प्रारूप RFP Document बाबत मा.प्रधान सचिव कामगार विभाग, मा. कामगार आयुक्त व मा. विकास आयुक्त, असंघटीत कामगार यांची संयुक्त बैठक मा. प्रधान सचिव यांचे दालनात दि.०२.०६.२०१७ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत प्रारूप RFP Document मध्ये काही बदल करावयाचे ठरले. सदर बदलानुसार सुधारित

RFP Document तयार करून दि. ०६.०६.२०१७ रोजीच्या मंडळाच्या बैठकीमध्ये मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटित कामगार मंडळ यांचे दोन वेगवेगळे सुविधा केंद्र स्थापन करण्याऐवजी एकच सुविधा केंद्र स्थापन करावे. सदर सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी स्वतंत्र संस्थेची नेमणूक करण्यात यावी. कार्यालयाची स्थापना व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठीच्या RFP Document मध्ये उपरोक्त बाबींचा समावेश करुन शासनमान्यतेस लवकरात लवकर सादर करण्यात यावा. तसेच, सुधारित आकृती बंध तयार करून शासन मान्यतेस पाठविण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने शासनास कार्यालयाची स्थापना व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठीच्या दोन वेगवेगळया RFP Document शासन मान्यतेकरीता सादर करण्यात आल्या होत्या. कामगार विभागामार्फत दि. १८.०१.२०१८ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संप्पन उच्चाधिकार समितीच्या (HPC) बैठकीत विषय सादर करण्यात आला होता सदर बैठकीत RFP Document ला उच्चाधिकार समितीची मान्यता आवश्यक नसल्याचे उद्योग, ऊर्जा कामगार विभागाने कळविले असून त्यास कामगार विभागाची मान्यता घेण्यात यावी असे कळविण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने शासनाने दि.०७.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारीमंडळ व असंघटीत कामगार मंडळ या दोन्ही मंडळामार्फत बांधकाम कामगार/ असंघटीत कामगारांची नोंदणी व कल्याणकारी योजनांचा लाभ देणेसाठी सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या RFP ला मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

कामगार विभागाच्या मान्यतेनुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटीत कामगार मंडळ या दोन्ही मंडळामार्फत बांधकाम कामगार/ असंघटीत कामगारांची नोंदणी व कल्याणकारी योजनांचा लाभ देणेसाठी सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत ई-निविदेच्या ३४ जिल्हा कार्यालय ०६ प्रादेशिक+जिल्हा कार्यालय अश्या ४० सुविधाकेंद्राशिवाय मुख्यालयाकरीता ०१ कार्यालय (अंदाजीत ७००० चौ. फुट) चा समावेश करून एकुण ४१ कार्यालयाकरीता ई-निविदेची जाहिरात प्रसिध्दीकरीता दि. २०.०२.२०१८ रोजी एक

राष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी या वृत्तपत्रात (इंडियन एक्सप्रेस) मध्ये व एक राज्यस्तरीय मराठी (लोकमत) या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर ई-निविदेबाबतच्या कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे मा. कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

| अ.क्र. | समितीतील सदस्य | पद |
|---|---|---|
| १. | मा. कामगार आयुक्त | मा. अध्यक्ष |
| २. | मा. विकास आयुक्त, (असंघटीत कामगार) | सदस्य |
| ३. | मा. उपसचिव (कामगार) | सदस्य |
| ४. | मा. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, मवइबाककमं | सदस्य |
| ५. | मा.सहसंचालक उद्योग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ६. | लेखाअधिकारी | सदस्य-सचिव |

वरील कार्यवाहीच्या अनुषंगाने खालील तपशिलानुसार Mahatenders.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदेचे डॉक्युमेंटस अपलोड करण्यात आले होते. निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विषय | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | ई-निविदा डाऊनलोड करणे | दि.२७.०२.२०१८ | स. १२.३० ते |
| | | ते २०.०३.२०१८ | दुपारी ४.०० पर्यंत |
| २. | निविदापूर्व बैठक | दि. ०६.०३.२०१८ | स. ११.३० वा. |
| ३. | निविदा सादर करणे | दि. २०.०३.२०१८ | दुपारी ४.०० पर्यंत |
| ४. | निविदा उघडणे | दि. २२.०३.२०१८ | दुपारी ११.३० वा. |

उपरोक्त वेळापत्रकानूसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटीत कामगार मंडळ या दोन्ही मंडळामार्फत बांधकाम कामगार/ असंघटीत कामगारांची नोंदणी व कल्याणकारी योजनांचा लाभ देणेसाठी सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत दि. ०६.०३.२०१८ सकाळी ११.३० वा. निविदा पुर्व बैठक आयोजित करण्यात आली होती, व त्यामधील ई- निविदेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ०४ संस्थानी सहभाग घेतला, सदर संस्थानी Tenders Doucument मध्ये सुधारणात्मक मुद्दे उपस्थित केले होते. सदर मुद्याबाबत समितीने

निर्णय घेऊन त्यामध्ये ई-निविदेच्या मसुद्यामध्ये आवश्यक बदल व सुधारणा करण्यासाठी मंडळाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. केपीएमजी यांना पुढील कार्यवाहीसाठी देण्यात आली आहे. सदर ई-निविदेला दि. ०६.०४.२०१८ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटीत कामगार मंडळ या दोन्ही मंडळामार्फत बांधकाम कामगार/ असंघटीत कामगारांची नोंदणी व कल्याणकारी योजनांचा लाभ देणेसाठी सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत मंडळाने केलेल्या कार्यवाहीबाबत मंडळास अवगत करून दिनांक ०६.०३.२०१८ रोजीच्या निविदापुर्व बैठकीत इच्छुक निविदाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यास अनुसरुन निविदा अटी शर्तीमध्ये खालीलप्रमाणे बदल करणे प्रस्तावित आहे.

१. देयकांची अदायगी- निविदेतील ६ टप्याऐवजी ५ टप्यात अदायगी करणे.
२. निविदेसोबत मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या जागेशिवाय इतर ठीकाणच्या जागेकरीता जागा मालकाची सहमती व सर्व ठीकाणचे भाडे दर सादर करणे आवश्यक राहील
३. निविदाकार स्वत: अथवा Consortium असलयास निविदाकाराकडे व Consurtium असल्यास पार्टनर कडे फर्निचर पुरवठा किंवा Installation व स्थापना या दोन्ही बाबीचा अथवा कमीत कमी एका कामाचा अनुभव असणे अनिवार्य राहिल.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटीत कामगार मंडळ या दोन्ही मंडळामार्फत बांधकाम कामगार/ असंघटीत कामगारांची नोंदणी व कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत HPC च्या मान्यतेस अनुसरून मंडळाने केलेल्या कार्यवाहीस व निविदेस प्रतिसाद वाढविण्याकरीता इच्छुक निविदाकारांच्या मागणीस अनुसरुन निविदेच्या अटी शर्तीमध्ये करावयाच्या प्रस्तावित बदलास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, त्यानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करून दर स्वीकृत व संस्था निश्चितीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. १२: मंडळाच्या सुधारित आकृतीबंधातील विविध पदांचे सेवाप्रवेश नियम मंजूर करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की,

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ६२ व कलम ४० द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ तयार केले असून २०११ रोजी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ या त्रिपक्षीय मंडळाची स्थापना केलेली आहे. त्रिपक्षीय मंडळाचा कार्यकाळ संपल्यानंतर दि.२८.०५.२०१५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे सदर मंडळाची पुनर्रचना करण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आस्थापनेवर मुंबई येथील मुख्यालयासाठी व जिल्हा स्तरावर एकूण ५६ पदांची निर्मिती मंडळस्तरावर करण्यासाठी संदर्भीय दिनांक ०३.१०.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आली आहे व सदर पदे मंडळस्तरावर भरती करण्यास अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाने संदर्भीय दिनांक ०४.१०.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सहमती दर्शविली आहे. सदर ५६ पदे खालीलप्रमाणे आहेत.

| अनु.क्र. | पदनाम | मंजूर पदे |
|---|---|---|
| १. | सहाय्यक कामगार आयुक्त | १ |
| २. | सरकारी कामगार अधिकारी | २० |
| ३. | लेखा व वित्त अधिकारी वर्ग २ | १ |
| ४. | अधीक्षक | १ |
| ५. | लेखापाल | १ |
| ६. | वरिष्ठ लिपिक | २ |
| ७. | मराठी/इंग्रजी लघुटंकलेखक | १ |
| ८. | लिपिक/टंकलेखक | २३ |
| ९. | वाहन चालक | २ |
| १०. | दप्तरी | १ |
| ११. | शिपाई | ३ |
| | **एकूण** | **५६** |

३. मंडळातील उक्त मंजूर पदांकरिता मंडळाने दिनांक २०.०४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये १) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील मंजूर पदांकरीता सहायक कामगार आयुक्त, (इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) (गट-अ) व सरकारी कामगार अधिकारी, (इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) (गट-ब) या पदांचे सेवाप्रवेश नियम, २०१६, २) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील गट-क संवर्गातील पदांचे सेवाप्रवेश नियम-२०१६ व ३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील चतुर्थश्रेणी पदांचे सेवाप्रवेश नियम-२०१६ चा सुधारीत मसुदा (इंग्रजी व मराठीमध्ये ) शासनाच्या मान्यतेसाठी दि. ०२/०४/२०१७ रोजी सादर करण्यात आला होता. सदर सेवा प्रवेश नियम मान्यतेसाठी विधी व न्याय विभागास सादर करण्यात आले असता, त्या विभागाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम ६२ व कलम १९ नूसार सदर सेवा प्रवेश मसूद्यांना तज्ञ समितीचा सल्ला घेऊन मगच तपासणीसाठी ते विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यात यावे असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार, दि. ०७.०९.२०१७ रोजी पार पडलेल्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या तज्ञ समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार सहाय्यक कामगार आयुक्त(म.इ.व इ.बां.का.क.मं.) गट अ व सरकारी कामगार अधिकारी (म.इ.व इ.बां.का.क.मं.) (गट ब) सेवा प्रवेश नियम तसेच म.इ.व इ.बां.का.क.मंडळातील गट क संवर्गातील सेवा प्रवेश नियम आणि म.इ.व इ.बां.का.क.मंडळातील गट ड संवर्गातील सेवा प्रवेश नियम २०१७ या नियमांना तज्ञ समितीची मान्यता देण्यात आली. त्यानुसार, महाराष्ट्र शासनास या कार्यालयाचे पत्र दि. ३१.१०.२०१७ रोजी सदर सेवाप्रवेश नियमांना मान्यता देवून मंडळाकरीता ५६ मंजूर पदे भरण्यास अनुमती देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली. शासनाने त्यांच्या पत्र दि. ०२.११.२०१७ अन्वये तज्ञ समितीच्या दि. ०७.०९.२०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तांस मान्यता दिली तसेच सामान्य प्रशासन विभाग आदेश दि. २५.०४.२०१६ व अधिसूचना दि. ०६.०६.२०१७ नुसार प्रस्तावित सेवा प्रवेश नियमांमध्ये बदल करुन सुधारित सेवा प्रवेश नियम शासनास सादर करण्याचे सुचित केले. त्यानुसार, दि. १४.११.२०१७ रोजी सुधारित सेवा प्रवेश नियम शासनास सादर करण्यात आले. सदर

सुधारित सेवा प्रवेश नियमांविषयी शासनाने काही मुद्दे उपस्थित करुन त्यांचे अनुपालन करण्याविषयी त्यांचे पत्र दि. ०८.१२.२०१७ नुसार सुचित केले आहे.

५. सद्यस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकाकरी मंडळ येथे मुख्यालय व जिल्हास्तरावर गट अ संवर्गात १ पद, गट ब संवर्गात २१ पदे, गट क संवर्गात ३० पदे व गट ड संवर्गात ४ पदे अशी ५६ पदे मंजूर आहेत. उक्त पदाव्यतिरीक्त मुख्यालय व ६ प्रादेशिक कार्यालय तसेच ४० जिल्हा कार्यालये येथे मिळून सर्व संवर्गातील ३६३ नविन पदे अशी एकुण ४१९ पदांची आवश्यकता आहे.

६. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचा दिवसेंदिवस वाढत असलेला व्याप, मंडळाकडे जमा होणार उपकर व बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनिकरण व त्या अनुषंगिक मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ अदा करण्यासाठी मंडळाची सक्षम मनुष्यबळ यंत्रणा निर्माण करण्यासाठी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांची एकत्रित ६ प्रादेशिक व ४० जिल्हा कार्यालये निर्माण करण्याकरीता प्रस्तावित केल्याप्रमाणे मंडळाच्या दि. १८.०७.२०१७ च्या बैठकीत उक्त सुधारीत आकृतीबंधाच्या मसूद्यास मान्यता देण्याबाबत खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव:** मंडळाचे मुख्यालयकरीता ५१, ६ प्रादेशिक कार्यालयाकरीता १८ व ४० जिल्हा कार्यालयाकरीता ३२० असे एकूण ४१९ पदांच्या सुधारित आकृतीबंधास व अंदाजित अपेक्षित वार्षिक खर्च रु.१०,१३,०५,४१८/- एवढया रक्कमेस सर्वानुमते मान्यता देण्यात यावी व सुधारित आकृतीबंधात प्रस्तावित ज्या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करणे आवश्यक आहे ते तयार करून सुधारित आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम मंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

उपरोक्त ठरावास मंडळाच्या दि. २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र शासन उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०८.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सुचीत केल्यानुसार मंडळाच्या सुधारीत आकृतीबंधातील यापूर्वी मंजूर ११ संवर्गातील पदे वगळून उर्वरित ९ संवर्गातील खालील पदांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्यात आले आहे.

| अनु.क्र. | पदनाम | मंजूर पदांची वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १. | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | रु. ३७४००-६७०००+८७०० |
| २. | कामगार उप आयुक्त | रु. १५६००-३९१००+६६०० |
| ३. | सहाय्यक संचालक वर्ग १ मविलेसे | रु. १५६००-३९१००+५४०० |
| ४. | विधी सल्लागार | रु. १५६००-३९१००+६६०० |
| ५. | लेखाधिकारी वर्ग २ मविलेसे | रु. ९३००-३४८००+४४०० |
| ६. | लघुलेखक उच्च श्रेणी | रु. ९३००-३४८००+४४०० |
| ७. | लघुलेखक निम्न श्रेणी | रु. ९३००-३४८००+४३०० |
| ८. | सहाय्यक लेखाधिकारी | रु. ९३००-३४८००+४३०० |
| ९. | डेटा एंट्री ऑपरेटर | रु.५२००-२०२००+१९०० |

उपरोक्त पदांचे सेवा प्रवेश नियम मान्यतेस्तव सोबत सादर करण्यात आले आहेत. सदर पदांच्या सेवा प्रवेश नियमांना मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर तज्ञ समितीच्या आगामी बैठकीत मान्यता घेण्यात येईल व मंडळाच्या सुधारित आकृतीबंधातील सर्व पदांचे एकत्रित सेवा प्रवेश नियम शासन मान्यतेस्तव सादर करण्यात येतील.

उपरोक्त पदांचे सेवा प्रवेश नियम २०१८ च्या सेवा प्रवेश नियमांना मान्यता देण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या दिनांक १८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर सुधारित आकृतीबंधातील खालील पदांच्या सेवाप्रवेश नियमास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| अनु.क्र. | पदनाम | मंजूर पदांची वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १. | **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **रु. ३७४००-६७००० + ८७००** |
| २. | **कामगार उप आयुक्त** | **रु. १५६००-३९१००+६६००** |
| ३. | **सहाय्यक संचालक वर्ग १ मविलेसे** | **रु. १५६००-३९१००+५४००** |
| ४. | **विधी सल्लागार** | **रु. १५६००-३९१००+६६००** |
| ५. | **लेखाधिकारी वर्ग २ मविलेसे** | **रु. ९३००-३४८००+४४००** |
| ६. | **लघुलेखक उच्च श्रेणी** | **रु. ९३००-३४८००+४४००** |
| ७. | **लघुलेखक निम्न श्रेणी** | **रु. ९३००-३४८००+४३००** |

| | | |
|---|---|---|
| ८. | सहाय्यक लेखाधिकारी | रु. ९३००-३४८००+४३०० |
| ९. | डेटा एंट्री ऑपरेटर | रु.५२००-२०२००+१९०० |

सदर सेवाप्रवेश नियमास मंडळाच्या तज्ञ समितीची मान्यता प्राप्त करून शासन मान्यतेस सादर करण्यात यावे तुर्तास मंडळाने व तज्ञ समितीने यापूर्वीच मान्यता प्रदान केलेल्या शासनमान्य ५६ पदाचे सेवाप्रवेश नियमास मान्यता देणेबाबत शासनास फेरविनंती करण्यात यावी, सदर पदे भरणेबाब अनुमती प्राप्त करावी व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

# अधिसूचना

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ,**
दिनांक:

क्रमांक.------ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन आणि या संदर्भात **इमारत व इतर बांधकाम कामगार (नोकरीचे विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम,१९९६ च्या कलम-१९ व इमारत व इतर बांधकाम कामगार (नोकरीचे विनियमन व सेवाशर्ती) नियम,२००७ च्या नियम ४०(ड) नुसार**महाराष्ट्र शासनाने गठीत केलेले महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, यांच्या आस्थापनेवरील **सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी, कामगार उपआयुक्त, सहाय्यक संचालक वर्ग -१, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, विधी सल्लागार (गट-अ), लेखा अधिकारी वर्ग-२ महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लघुलेखक उच्च श्रेणी आणि लघुलेखक निम्न श्रेणी (गट-ब)** या पदांच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत:

१) या नियमांना **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी, कामगार उपआयुक्त, सहाय्यक संचालक वर्ग -१, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, विधी सल्लागार (गट-अ), लेखा अधिकारी वर्ग-२ महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लघुलेखक उच्च श्रेणी आणि लघुलेखक निम्न श्रेणी (गट-ब) या पदांचे सेवा प्रवेश नियम २०१८** असे संबोधण्यात यावे.

२) ते दिनांक -----------------पासून अंमलात आल्याचे मानन्यात येईल.

३) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर-

(अ) **"अध्यक्ष"** म्हणजे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष

(ब) **"मंडळ"** म्हणजे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,

(क) **"शासन"** म्हणजे महाराष्ट्र शासन,

(ड) **"अनुसूची"**म्हणजे या नियमांना जोडलेली अनुसूची

(इ) **"पदवी"** म्हणजे मान्यताप्राप्त सांविधानिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी

(फ) **"माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा"** म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम,१९६५ अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाने नियंत्रित केलेली

माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा यामध्ये शासनाने या परीक्षेत समकक्ष म्हणून घोषित केलेल्या इतर कोणतीही परीक्षा अंतर्भूत आहे.

४) १. <u>सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावरील नेमणूक पुढील कोणत्याही मार्गाने करता येईल.</u>

१) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण (रोजगार, नियम व सेवाशर्थी) अधिनियम १९९६ च्या कलम १९ नूसार मंडळ सचिवाची नियुक्ती करू शकेल. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या (रोजगार, नियम व सेवाशर्थी) नियम २००७ च्या नियम ४० अ नुसार ही नियुक्ती करण्यात येइल.

२) सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद सह आयुक्त कामगार या पदाला समकक्ष असेल.

३) सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर शक्य झाल्यास राज्य शासनातील वर्ग एक मधील अधिकाऱ्याची व विशेष पसंतीने कामगार विभागातील अधिकाऱ्याची शासन मान्यतेने प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येईल.

४) प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती शासनाने विहित केल्यानुसार असतील. नियम २००७ च्या ४० ब नूसार प्रतिनियुक्तीचा कालावधी तीन वर्षापेक्षा जास्त नसेल.

५) जर सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी पदासाठी राज्य शासनाकडून अधिकारी उपलब्ध नसेल तर नियम ४० ड नुसार राज्य शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून विनिर्देश केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंडळ हे सरळ सेवेने सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्त करू शकेल.

६) पदोन्नती/सरळ सेवेसाठी सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद सह आयुक्त कामगार पदाला समकक्ष असेल.

पदोन्नतीने हे पद भरताना या पदावर नेमणूक

अ) अप्पर आयुक्त कामगार हे पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधील काटेकोर निवड या आधारावर पात्र व्यक्तींच्या पदोन्नतीने किंवा

ब) महाराष्ट्र शासनाच्या कोणऱ्याही राज्य सेवेतील समकक्ष पद धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्याच्या बदलीने.

७) सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर सरळसेवेने नियुक्ती खालीलप्रमाणे केली जाईल.

१. शासन सेवेत आधीपासून नसेल तर सदर उमेदवाराचं वय नियुक्तीच्या दिनांकास ४३ पेक्षा जास्त नसेल.

सदर उमेदवार

(ब) पुढील अटी पूर्ण करणा-या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने:-

(१) शासन सेवेतील प्रवेशासाठी, किमान वयोमर्यादा १८ असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील.

याशिवाय ज्या प्रवर्ग/घटकांकरिता सध्या असलेली वयोमर्यादा ४३ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्यांच्यासाठी तसेच वरील दोन प्रवर्ग वगळता इतर प्रवर्गांकरिता देखील कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. परंतु अगोदरपासून शासकीय अथवा निमशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा १० वर्षांपर्यन्त शिथिल करता येईल.

(२) ज्यांनी पदव्युत्तर पदवी किंवा २ वर्षाची कामगार कल्याण/औद्योगिक संबंध आणि कार्मिक व्यवस्थापन या विषयातील ०२ वर्षाची पदव्युत्तर पदविका धारक केलेली आहे. तसेच ज्यांनी कोणत्याही शाखेतील किमान द्वितीय श्रेणीतील पदवी किंवा त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली अन्य अर्हता धारण केलेली आहे.

(३) औद्योगिक उपक्रम किंवा व्यावसायिक आस्थापना, स्थानिक संस्था किंवा शासकीय विभाग किंवा शासनाने निर्माण केलेले मंडळ येथील कामगार अधिकारी किंवा कल्याण अधिकारी या जबाबदारीच्या पदावरील किमान ०३ वर्षे कालावधीचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव धारण केलेला आहे.

(४) ज्यांना मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आहे.

(५) ज्यांना MSCIT परीक्षा उत्तीर्ण व संगणकाचे ज्ञान आहे.

(क) पदोन्नती व नामनिर्देशन या मार्गांनी करावयाच्या नेमणूका ५०:५० या प्रमाणात करता येतील

(ड) सदरची पदे राज्य शासनाच्या समश्रेणीच्या अधिकाऱ्यांमधून ३ वर्षासाठी प्रतिनियुक्तीने भरता येतील.

५. उक्त पदावर नामनिर्देशनाने नेमणूक केलेली व्यक्ती ०२ वर्षाच्या परिविक्षा कालावधीवर राहील.

६. सदर पदावर पदोन्नती किंवा नामनिर्देशन यापैकी कोणत्याही मार्गाने नेमणूक झालेल्या व्यक्तीने विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल. तसेच हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी शासनाने केलेल्या नियमानुसार ते पूर्वीच उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा उत्तीर्ण होणे पासून सूट मिळालेली नसल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहिल.

७. सदर नियमावलीत बदल करणे, नियम रद्द करणे अथवा नवीन नियमांचा समावेश करण्याचे अधिकार शासनाला राहतील

८. सदर नियमावलीतील नियमांबाबत संभ्रम निर्माण झाल्यास त्याचा योग्य अर्थबोध ठरविणे व तत्संबंधी निर्देश देण्याचे अधिकार शासनास राहतील.

९. सदर पदावर नियुक्ती केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

१०. उपरोक्त नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सेवेची निकड लक्षात घेऊन जेव्हा आवश्यक असेल तेव्हा नामनिर्देशनाने भरती करण्याचे जे सेवा प्रवेशाचे प्रमाण विहित केले आहे ते प्रमाण शिथिल करावे, असे शासनाच्या/मंडळाच्या मते आवश्यक वाटल्यास त्याप्रमाणे शिथिल करुन मंडळास शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून नेमणूका करता येतील.

११. शासनाने वेळोवेळी तयार केलेले आरक्षणाच्या धोरणाबाबतचे विहित नियम या पदांना लागु रहातील.

४) (२) <u>कामगार उपआयुक्त या पदावरील नेमणूक पुढील कोणत्याही मार्गाने करता येईल.</u>

(अ) मंडळातील सहाय्यक कामगार आयुक्त या पदावर सलग ०३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून गुणवत्ता निवड अथवा ज्येष्ठतेधीन पात्रता, मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षणाच्या प्रचलित व विहित शासन नियमानुसार या आधारावर पात्र ठरविलेल्या सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या पदोन्नतीने.

(ब) पुढील अटी पूर्ण करणा-या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने:-

(१) शासन सेवेतील प्रवेशासाठी, किमान वयोमर्यादा १८ असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील. याशिवाय ज्या प्रवर्ग/घटकांकरिता सध्या असलेली वयोमर्यादा ४३ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्यांच्यासाठी तसेच वरील दोन प्रवर्ग वगळता इतर प्रवर्गांकरिता देखील कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. परंतु अगोदरपासून शासकीय अथवा निमशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा १० वर्षांपर्यन्त शिथिल करता येईल.

(२) ज्यांनी पदव्युत्तर पदवी किंवा २ वर्षांची कामगार कल्याण/औद्योगिक संबंध आणि

कार्मिक व्यवस्थापन या विषयातील ०२ वर्षाची पदव्युत्तर पदवीका धारक केलेली आहे. तसेच ज्यांनी कोणत्याही शाखेतील किमान द्वितीय श्रेणीतील पदवी किंवा त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली अन्य अर्हता धारण केलेली आहे.

(३) औद्योगिक उपक्रम किंवा व्यवसायिक आस्थापना, स्थानिक संस्था किंवा शासकीय विभाग किंवा शासनाने निर्माण केलेले मंडळ येथील कामगार अधिकारी किंवा कल्याण अधिकारी या जबाबदारीच्या पदावरील किमान ०३ वर्षे कालावधीचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव धारण केलेला आहे.

(४) ज्यांना मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आहे.

(५) ज्यांना MSCIT परीक्षा उत्तीर्ण व संगणकाचे ज्ञान आहे.

(क) पदोन्नती व नामनिर्देशन या मार्गांनी करावयाच्या नेमणूका ५०:५० या प्रमाणात करता येतील

(ड) सदरची पदे राज्य शासनाच्या समश्रेणीच्या अधिकाऱ्यांमधून ३ वर्षासाठी प्रतिनियुक्तीने भरता येतील.

५. उक्त पदावर नामनिर्देशनाने नेमणूक केलेली व्यक्ती ०२ वर्षाच्या परिविक्षा कालावधीवर राहील.

६. सदर पदावर पदोन्नती किंवा नामनिर्देशन यापैकी कोणत्याही मार्गाने नेमणूक झालेल्या व्यक्तीने विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल. तसेच हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी शासनाने केलेल्या नियमानुसार ते पूर्वीच उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा उत्तीर्ण होणे पासून सूट मिळालेली नसल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहिल.

७. सदर नियमावलीत बदल करणे, नियम रद्द करणे अथवा नवीन नियमांचा समावेश करण्याचे अधिकार शासनाला राहतील

८. सदर नियमावलीतील नियमांबाबत संभ्रम निर्माण झाल्यास त्याचा योग्य अर्थबोध ठरविणे व तत्संबंधी निर्देश देण्याचे अधिकार शासनास राहतील.

९. सदर पदावर नियुक्ती केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

१०. उपरोक्त नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सेवेची निकड लक्षात घेऊन जेव्हा आवश्यक असेल तेव्हा नामनिर्देशनाने भरती करण्याचे जे सेवा प्रवेशाचे प्रमाण विहित केले आहे ते प्रमाण शिथिल करावे,

असे शासनाच्या/मंडळाच्या मते आवश्यक वाटल्यास त्याप्रमाणे शिथिल करुन मंडळास शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून नेमणूका करता येतील.

११. शासनाने वेळोवेळी तयार केलेले आरक्षणाच्या धोरणाबाबतचे विहित नियम या पदांना लागु रहातील.

४) (३) **सहाय्यक संचालक वर्ग -१ महाराष्ट्र वित्त् व लेखा सेवा** – या पदावर महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गात सहाय्यक संचालक या पदावर किमान तीन वर्षे कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येईल. प्रतिनियुक्तीच्या अटी आणि शर्ती शासनाने विहित केल्यानुसार असतील.

४) (५) **विधी सल्लागार (अवर सचिव, विधी)या पदावरील नेमणूक पुढील कोणत्याही मार्गाने करता येईल.**

१. (अ)"अधीक्षक (विधी)" हे पद धारण करीत असलेल्या व या पदावर तीन वर्षांहून कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तिंमधून, ज्येष्ठतेच्या आधारावर, पात्रतेनूसार सूयोग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल; किंवा

(ब) खालील उमेदवारांमधुन नामनिर्देशनाने, जे,

(एक) त्रेचाळीस वर्षांपेक्षा जास्त वयाचे नाही; परंतु जे उमेदवार या आधीच शासन सेवेत असतील, अशा उमेदवारांकरिता वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील; आणि

(दोन) कायद्याची पदवी धारण करतात; आणि

(तीन) खालील पद धारण करत आहेत किंवा धारण केलेले आहे.

(१) "सहाय्यक (विधी)" पद किमान ८ वर्षे; किंवा

(२) "अधिक्षक (विधी)" पद किमान ५ वर्षे; किंवा

(३) न्यायीक सेवेतील "दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) व न्याय दंडाधिकारी (प्रथम वर्ग)" हे पद किमान दोन वर्षे; किंवा

(४) उच्च न्यायालय किंवा त्यांचे अधिपत्याखालील इतर न्यायालयांमध्ये किमान पाच वर्षे अधिवक्ता/वकील.

२.नियम ४ पोट- नियम (ब) खंड (३) [redacted]

३. विधी सल्लागार या पदावरील नेमणूका पदोन्नतीने आणि नामनिर्देशनाने ४०:६० या प्रमाणात करण्यात येतील

४. नियम ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तीचा परिविक्षाधीन कालावधी २ वर्षांचा असेल. परिविक्षा कालावधी जास्तीत जास्त एका वर्षाने वाढविण्यात येईल. या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस त्या पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण आणि विभागीय परिक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमांनूसार उर्त्तीर्ण होणे आणि परिविक्षा कालावधी विहित मूदतीत यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. जर त्याने/तीने विहित केलेले प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेले नाही किंवा विभागीय परिक्षा उर्त्तिर्ण केलेली नाही किंवा विहित मूदतीत त्या पदासाठी तो/ती अपात्र आढळल्यास त्याची किंवा तीची सेवा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय समाप्त करण्यात येईल.

**४) (६) लेखा अधिकारी वर्ग-२ महाराष्ट्र वित्त् व लेखा संवर्ग-** प्रतिनियुक्तीने नेमणूक

या पदावर महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गात लेखा अधिकारी वर्ग २ या पदावर किमान तीन वर्षे कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येईल. प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती शासनाने विहित केल्यानूसार असतील.

**४) (७) लघुलेखक उच्च श्रेणी या पदावरील नेमणूक पुढील कोणत्याही मार्गाने करता येईल.**

१. (अ) मंडळातील लघुलेखक निम्न श्रेणी या पदावर सलग ०३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून गुणवत्ता निवड अथवा ज्येष्ठतेधीन पात्रता, मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षणाच्या प्रचलित व विहित शासन नियमानुसार या आधारावर पात्र ठरविलेल्या लघुलेखक निम्न श्रेणीच्या पदोन्नतीने.

(ब) पुढील अटी पूर्ण करणा-या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने:-

(१) शासन सेवेतील प्रवेशासाठी, किमान वयोमर्यादा १८ असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील. याशिवाय ज्या प्रवर्ग/घटकांकरिता सध्या असलेली वयोमर्यादा ४३ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्यांच्यासाठी तसेच वरील दोन प्रवर्ग वगळता इतर

प्रवर्गांकरिता देखील कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. परंतु अगोदरपासून शासकीय अथवा निमशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा १० वर्षांपर्यन्त शिथिल करता येईल.

(२) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा/ची कोणत्याही शाखेचा/ची पदवीधर असेल.

राज्य शासनाची मराठी लघुलेखनाची १०० शब्द प्रति मिनिट तसेच इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट व मराठी ४० शब्द प्रति मिनिट टंकलेखनाची वेगाची परीक्षा उत्तीर्ण असेल. अथवा राज्य शासनाची इंग्रजी लघुलेखनाची १२० शब्द प्रति मिनिट तसेच इंग्रजी टंकलेखनाची ४० शब्द प्रति मिनिट व मराठी टंकलेखनाची ४० शब्द प्रति मिनिट वेगाची परीक्षा उत्तीर्ण असेल.

(क) पदोन्नती व नामनिर्देशन या मार्गांनी करावयाच्या नेमणूका ५०:५० या प्रमाणात करता येतील

(ड) सदरची पदे राज्य शासनाच्या समश्रेणीच्या अधिकाऱ्यांमधून ३ वर्षासाठी प्रतिनियुक्तीने भरता येतील.

२. उक्त पदावर नामनिर्देशनाने नेमणूक केलेली व्यक्ती ०२ वर्षाच्या परिविक्षा कालावधीवर राहील.

३. सदर पदावर पदोन्नती किंवा नामनिर्देशन यापैकी कोणत्याही मार्गाने नेमणूक झालेल्या व्यक्तीने विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल. तसेच हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी शासनाने केलेल्या नियमानुसार ते पूर्वीच उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा उत्तीर्ण होणे पासून सूट मिळालेली नसल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहिल.

४. सदर नियमावलीत बदल करणे, नियम रद्द करणे अथवा नवीन नियमांचा समावेश करण्याचे अधिकार शासनाला राहतील

५. सदर नियमावलीतील नियमांबाबत संभ्रम निर्माण झाल्यास त्याचा योग्य अर्थबोध ठरविणे व तत्संबंधी निर्देश देण्याचे अधिकार शासनास राहतील.

६. सदर पदावर नियुक्ती केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

७. उपरोक्त नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सेवेची निकड लक्षात घेऊन जेव्हा आवश्यक असेल तेव्हा नामनिर्देशनाने भरती करण्याचे जे सेवा प्रवेशाचे प्रमाण विहित केले आहे ते प्रमाण शिथिल करावे, असे

शासनाच्या/मंडळाच्या मते आवश्यक वाटल्यास त्याप्रमाणे शिथिल करुन मंडळास शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून नेमणूका करता येतील.

८. शासनाने वेळोवेळी तयार केलेले आरक्षणाच्या धारेणाबाबतचे विहित नियम या पदांना लागु रहातील.

४) (८) <u>लघुलेखक निम्न श्रेणी</u> <u>या पदावरील नेमणूक पुढील कोणत्याही मार्गाने करता येईल.</u>

२. (अ) मंडळातील लघुटंकलेखक या पदावर सलग ०३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून गुणवत्ता निवड अथवा ज्येष्ठतेधीन पात्रता, मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षणाच्या प्रचलित व विहित शासन नियमानुसार या आधारावर पात्र ठरविलेल्या लघुटंकलेखकाच्या पदोन्नतीने.

**(ब)** पुढील अटी पूर्ण करणा-या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने:-

(३) शासन सेवेतील प्रवेशासाठी, किमान वयोमर्यादा १८ असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील. याशिवाय ज्या प्रवर्ग/घटकांकरिता सध्या असलेली वयोमर्यादा ४३ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्यांच्यासाठी तसेच वरील दोन प्रवर्ग वगळता इतर प्रवर्गांकरिता देखील कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. परंतु अगोदरपासून शासकीय अथवा निमशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा १० वर्षांपर्यन्त शिथिल करता येईल.

(४) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा/ची कोणत्याही शाखेचा/ची पदवीधर असेल.
राज्य शासनाची मराठी लघुलेखनाची ८० शब्द प्रति मिनिट तसेच मराठी आणि इंग्रजी टंकलेखनाचे ४० शब्द प्रति मिनिट वेगाची परीक्षा उत्तीर्ण असेल. अथवा राज्य शासनाची इंग्रजी लघुलेखनाची १०० शब्द प्रति मिनिट तसेच इंग्रजी टंकलेखनाची ४० शब्द प्रति मिनिट व मराठी टंकलेखनाची ४० शब्द प्रति मिनिट वेगाची परीक्षा उत्तीर्ण असेल.

(ख) पदोन्नती व नामनिर्देशन या मार्गांनी करावयाच्या नेमणूका ५०:५० या प्रमाणात करता येतील

(ड) सदरची पदे राज्य शासनाच्या समश्रेणीच्या अधिकाऱ्यांमधून ३ वर्षासाठी प्रतिनियुक्तीने भरता येतील.

२. उक्त पदावर नामनिर्देशनाने नेमणूक केलेली व्यक्ती ०२ वर्षाच्या परिविक्षा कालावधीवर राहील.

३. सदर पदावर पदोन्नती किंवा नामनिर्देशन यापैकी कोणत्याही मार्गाने नेमणूक झालेल्या व्यक्तीने विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल. तसेच हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी शासनाने केलेल्या नियमानुसार ते पूर्वीच उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा उत्तीर्ण होणे पासून सूट मिळालेली नसल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहिल.

४. सदर नियमावलीत बदल करणे, नियम रद्द करणे अथवा नवीन नियमांचा समावेश करण्याचे अधिकार शासनाला राहतील

५. सदर नियमावलीतील नियमांबाबत संभ्रम निर्माण झाल्यास त्याचा योग्य अर्थबोध ठरविणे व तत्संबंधी निर्देश देण्याचे अधिकार शासनास राहतील.

६. सदर पदावर नियुक्ती केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

७. उपरोक्त नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सेवेची निकड लक्षात घेऊन जेव्हा आवश्यक असेल तेव्हा नामनिर्देशनाने भरती करण्याचे जे सेवा प्रवेशाचे प्रमाण विहित केले आहे ते प्रमाण शिथिल करावे, असे शासनाच्या/मंडळाच्या मते आवश्यक वाटल्यास त्याप्रमाणे शिथिल करुन मंडळास शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून नेमणूका करता येतील.

८. शासनाने वेळोवेळी तयार केलेले आरक्षणाच्या धारेणाबाबतचे विहित नियम या पदांना लागु रहातील.

८. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नती किंवा नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तिस, जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, त्यासंबंधी करण्यात आलेल्या नियमांनुसार त्याला/तिला हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहीत.

# अधिसूचना

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ,**
दिनांक:

क्रमांक.----- भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन आणि या संदर्भात **इमारत व इतर बांधकाम कामगार (नोकरीचे विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम,१९९६ च्या कलम-१९ व इमारत व इतर बांधकाम कामगार (नोकरीचे विनियमन व सेवाशर्ती) नियम,२००७ च्या नियम ४०(ड) नुसार**महाराष्ट्र शासनाने गठीत केलेले महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, यांच्या आस्थापनेवरील **सहाय्यक लेखा अधिकारी वर्ग-३, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, डाटा एंट्री ऑपरेटर (गट-क)** या पदांच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत:

(१) या नियमांना **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** कल्याणकारी **मंडळातील गट-क संवर्गातील पदांचे सेवा प्रवेश नियम-२०१८** असे संबोधण्यात यावे.

(२) ते दिनांक ----------------- पासून अंमलात आल्याचे मानन्यात येईल.

(३) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर-

(अ)"**अध्यक्ष**" म्हणजे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष

(ब) "**मंडळ**" म्हणजे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,

(क) "**शासन**" म्हणजे महाराष्ट्र शासन,

(ड) "**अनुसूची**" म्हणजे या नियमांना जोडलेली अनुसूची

(इ) "**पदवी**" म्हणजे मान्यता प्राप्त सांविधानिक विद्यापीठाची पदवी

मंडळाचे उद्दिष्टे साध्य करण्याकरीता आणि बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी शासनाद्वारे आणि मंडळाद्वारे वेळोवेळी अनेक पावले उचलली जात असून सन २०१७-१८ मध्ये पुढील निर्णय घेऊन जास्तीत जास्त बांधकाम कामगारांची नोंदणी करण्याचा प्रयत्न मंडळामार्फत करण्यात येत आहे.

१. बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी कामगार विभागाशिवाय अन्य विभागातील गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुख्याधिकारी नगरपरिषद, प्रभाग क्षेत्र अधिकारी

(वॉर्ड ऑफिसर) महानगरपालिका, उप अभियंता (सार्वजनिक बांधकाम/ जलसंधारण विभाग/ पाणीपुरवठा विभाग) व कामगार विभागातील कामगार कल्याण मंडळाचे अधिकारी यांना दि.०२.०१.२०१८ रोजीच्या शासन आदेशान्वये नोंदणी अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

२. बांधकाम कामाच्या व्याख्येमध्ये बांधकामाशी संबंधित २१ कामे अंतर्भूत करण्याबाबतची अधिसूचना उद्योग, उर्जा व कामगार विभागामार्फत दि.१८.०८.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आली. त्यामुळे बांधकामाशी संबंधित सर्व कामावरील बांधकाम कामगारांची नोंदणी करणे शक्य होत आहे.

३. बांधकाम क्षेत्रातील नोंदीत बांधकाम कामगार संघटनांची नोंदणी व लाभवाटपाकरीता मदत घेण्याचा निर्णय दि. १५.०९.२०१७ रोजी कामगार विभागाने घेतला आहे.

४. बांधकाम कामगारांची मासिक वर्गणी दरमहा रू.०५ ऐवजी रू.०१/- एवढी कमी करणेबाबतची अधिसूचना उद्योग, उर्जा व कामगार विभागामार्फत दि.१५.०१.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. त्यामुळे बांधकाम कामगाराने रू.६०/- एवढी वर्गणी एकदाच मंडळाकडे जमा केल्यास पुढील ०५ वर्ष वर्गणी जमा करण्याची आवश्यकता राहणार नाही.

५. उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०६.१२.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वय समिती पुर्नगठीत करण्यात येऊन सदर समितीने बांधकाम कामगारांची नोंदणी, बांधकाम कामगारांचे नोंदणीचे नुतनीकरण, नोंदीत बांधकाम कामगाराकरीता कल्याणकारी योजना अंतर्गत लाभ वाटप व उपकर वसुलीबाबतचा आढावा नियमित स्वरूपात घेणे अपेक्षित आहे.

➢ बांधकाम कामगारांची वर्ष निहाय नोंदणी

| अनु.क्र | आर्थिक वर्ष | वर्ष निहाय कामगारांची नोंदणी संख्या | वर्ष अखेर कामगारांची नोंदणी संख्या |
|---|---|---|---|
| १. | २०११-१२ | ३३७९४ | ३३७९४ |
| २. | २०१२-१३ | ८२४०३ | ११६१९७ |
| ३. | २०१३-१४ | ८२६६७ | १९८८६४ |
| ४. | २०१४-१५ | १७५५७९ | ३७४४४३ |
| ५. | २०१५-१६ | १२१२२५ | ४९५६६८ |
| ६. | २०१६-१७ | ८६२४२ | ५८१९१० |
| ७ | २०१७-१८ | ३५१४१६ | ९३३३२६ |
| ८ | २०१८-१९ (प्रस्तावित) | २५०००० | ११८३३२६ |

**<u>मंडळाची जमा</u>**

१. जमा उपकर :- इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी उपकर अधिनियम १९९६ च्या कलम ३ (१) नुसार केंद्र शासनाने अधिसूचना क्र. एसओ २८९९, दि.२६.०९.१९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मूल्याच्या (जमिनीचे मूल्य वगळून) १% दराने उपकर जमा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. केंद्र शासनाच्या सदर अधिसूचनेस अनुसरून उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे परिपत्रक क्र.बीसीए/१२००७/प्र.क्र.७८८/ कार्यासन -७ दि.२१.०४.२००८ अन्वये निर्गमित सूचनेनुसार दि.०१.०१.२००८ पासून राज्यातील इमारत व इतर बांधकाम नियोक्याकडून उपकर वसूलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

➢ मंडळाकडे वर्ष निहाय जमा उपकर (रुपये कोटीत)

| अनु क्र. | आर्थिक वर्ष | वर्ष निहाय जमा रक्कम | वर्ष अखेर जमा रक्कम |
|---|---|---|---|
| १. | २००७-०८ | ००.७७ | ०.७७ |
| २. | २००८-०९ | ००.६० | १.३७ |
| ३. | २००९-१० | ०९.४९ | १०.८६ |
| ४. | २०१०-११ | ८९.१० | ९९.९६ |
| ५. | २०११-१२ | ४२५.९८ | ५२५.९४ |
| ६. | २०१२-१३ | ७७७.७० | १३०३.६४ |
| ७. | २०१३-१४ | ७८८.६० | २०९२.२४ |
| ८. | २०१४-१५ | ८०२.११ | २८९४.३५ |
| ९. | २०१५-१६ | १११०.०४ | ४००४.३९ |
| १०. | २०१६-१७ | १०६९.८४ | ५०७४.२३ |
| ११. | २०१७-१८ | ११७०.०० | ६२४४.२३ |
| १२. | २०१८-१९ (प्रस्तावित) | १२५०.०० | ७४९४.२३ |

२. **नोंदणी शुल्क** :- मंडळाच्या मंजूर ठरावानुसार बांधकाम कामगारांचे नोंदणी शुल्क प्रति कामगार रु.२५/- एवढी आकारण्यात येते.

➢ **वर्ष निहाय जमा नोंदणी फी** **(रु. लाखात)**

| अनु क्र. | आर्थिक वर्ष | वर्ष निहाय कामगारांची नोंदणी संख्या | नोंदणी वर्गणी (रु. २५) | वर्षअखेर जमा |
|---|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | ३३७९४ | ८.४५ | ८.४५ |
| २ | २०१२-१३ | ८२४०३ | २०.६० | २९.०५ |
| ३ | २०१३-१४ | ८२६६७ | २०.६७ | ४९.७२ |
| ४ | २०१४-१५ | १७५५७९ | ४३.८९ | ९३.६१ |
| ५ | २०१५-१६ | १२१२२५ | ३०.३१ | १२३.९२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | २०१६-१७ | ८६२४२ | २१.५६ | १४५.४८ |
| ७ | २०१७-१८ | ३५१४१६ | ८३.८० | २२९.२८ |
| ८ | २०१८-१९ (प्रस्तावित) | २५०००० | ६५.०० | २९४.२८ |

३. **मासिक वर्गणी :-** बांधकाम कामगारांची मासिक वर्गणी दरमहा रू.०५ ऐवजी रू.०१/- एवढी कमी करणेबाबतची अधिसूचना उद्योग, उर्जा व कामगार विभागामार्फत दि.१५.०१.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. त्यामुळे बांधकाम कामगाराने रू.६०/- एवढी वर्गणी एकदाच मंडळाकडे जमा केल्यास व दरवर्षी ९० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त काम केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास पुढील ०५ वर्षापर्यंत बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रिय राहील.

> **बांधकाम कामगारांकडून जमा मासिक वर्गणीचा वर्षनिहाय तपशील**

**(रू. लाखात)**

| अनु.क्र. | आर्थिक वर्ष | वर्षनिहाय कामगारांची नोंदणी संख्या | वार्षिक वर्गणी (रू. ६०) | वर्षअखेर जमा |
|---|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | ३३७९४ | २०.२७ | २०.२७ |
| २ | २०१२-१३ | ८२४०३ | ४९.४४ | ६९.७१ |
| ३ | २०१३-१४ | ८२६६७ | ४९.६० | ११९.३१ |
| ४ | २०१४-१५ | १७५५७९ | १०५.३५ | २२४.६६ |
| ५ | २०१५-१६ | १२१२२५ | ७२.७३ | २९७.३९ |
| ६ | २०१६-१७ | ८६२४२ | ५१.७४ | ३४९.१३ |
| ७ | २०१७-१८ | ३५१४१६ | १०६.०० | ४५५.१३ |
| ८ | २०१८-१९ (प्रस्तावित) | २५०००० | ३५.०० | ४९०.१३ |

**४.मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवूणकीवरील व्याज** :- मंडळाकडे जमा निधी मधून नोंदीत बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवर खर्च करण्यात येतो व अतिरिक्त निधीची गुंतवूणक मा. सर्वोच्च न्यायालय रिट पिटिशन नं. W.P.(c) ३१८/२०१६ Contempt Petition No.५२ of २०१३ च्या दि. ०४.०८.२०१७ रोजीच्या आदेशाबाबत शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांच्या दि. २२.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही करण्याबाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे फक्त राष्ट्रीयकृत बँकांमध्येच करण्यात येते.

- **मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवूणकीवर प्राप्त व्याजाचा वर्षनिहाय तपशील**

(रु. कोटीत)

| अनु.क्र. | आर्थिक वर्ष | गुंतवणूक रक्कम (रुपये कोटीत) | व्याज रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | ३४५.०० | ०.०० |
| २ | २०१२-१३ | ११९०.१३ | ३५.४५ |
| ३ | २०१३-१४ | ११७७.०० | ११३.५५ |
| ४ | २०१४-१५ | २४८९.०० | १९३.४३ |
| ५ | २०१५-१६ | ३७८९.७४ | २३१.४२ |
| ६ | २०१६-१७ | ३०५०.०० | ३०२.२५ |
| ७ | २०१७-१८ | ६५८४.६५ | २११.८३ |
| ८ | २०१८-१९ (प्रस्तावित) | ६५००.०० | ४११.१७ |

**४. केंद्र शासन व राज्य शासनाकडून अर्थसहाय्य/ अनुदान** :- महराष्ट इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास महाराष्ट्र शासनाकडून मंडळास कोणत्याही प्रकारचे अर्थसह य्य अथवा अनुदान प्राप्त होत नाही.

➢ **मंडळाकडे बाबनिहाय प्रत्यक्ष** जमा **रक्कमा व सन २०१८-१९ वर्षाच्या** जमेचे **अंदाज**

रू. कोटीत

| अ. क्र. | **जमेची बाब** | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ (अर्थसंकल्पीय) | २०१७-१८ | २०१८-१९ प्रस्तावित **जमा** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उपकर | ८०२.११ | १११०.०४ | १०६९.८ | १२००.०० | ११७०.०० | १२५०.०० |
| २. | कामगार नोंदणी फी | ०.४४ | ०.३० | ०.२२ | ०.२७ | ०.८४ | ०.६२ |
| ३. | कामगार मासिक वर्गणी | १.०५ | ०.७३ | ०.५२ | १.२४ | १.०६ | ०.३० |
| ४. | गुंतवणूक वरील व्याज | १९३.४३ | २३१.४२ | ३०२.२५ | १६३.८१ | २११.८३ | ४११.१७ |

## मंडळाचा खर्च:

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे जमा होणारा निधी इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम २४ नुसार मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवर खर्च करण्यात येतो.

अ) **कल्याणकारी योजनावरील खर्च** :-मंडळामार्फत सद्यस्थितीत २८ कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहे. याशिवाय ०५ नवीन योजना आगामी आर्थिक वर्षात राबविणे प्रस्तावित आहे.

➢ **मंडळामार्फत कल्याणकारी योजनांवर करण्यात आलेल्या खर्चाचा वर्ष निहाय तपशील व सन २०१८-१९चे अंदाजपत्रक** (रू. कोटीत)

| अनु क्र. | आर्थिक वर्ष | वर्ष निहाय खर्च | वर्ष अखेर खर्च |
|---|---|---|---|
| १. | २०११-१२ | ००.२५ | ००.२५ |
| २. | २०१२-१३ | ०.३४ | ०.५९ |
| ३. | २०१३-१४ | ३७.७३ | ३८.३२ |
| ४. | २०१४-१५ | ७०.७९ | १०९.११ |
| ५. | २०१५-१६ | ३५.२१ | १४४.३२ |
| ६. | २०१६-१७ | १४.७१ | १५९.०३ |
| ७. | २०१७-१८ | १२९.२६ | २८८.२९ |
| ८. | २०१८-१९ (प्रस्तावित) | १८७०.०० | २१५८.२९ |

**ब) प्रशासकीय बाबींवरील खर्च :-**

➢ मंडळाचे कामकाज कामगार आयुक्त यांच्या कार्यालयाच्या आस्थापनेवरील तसेच बाहययंत्रणेद्वारे घेतलेल्या कर्मचाऱ्यांकडून पार पाडले जात आहे. मंडळाचे स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी नेमणूकीची कार्यवाही करण्यात येत आहे.

➢ मंडळामार्फत करण्यात येत असलेल्या प्रशासकीय खर्चामध्ये प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांचे वेतन भत्ते, बाहय यंत्रणेद्वारे नियुक्त कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते, प्रवास खर्च, मंडळाच्या बैठकांचा खर्च, सनदी लेखापालांची फी , भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांचे लेखापरीक्षण फी, कार्यालयीन भाडे, मंडळावर नियुक्त प्रकल्प सल्लागार संस्थे चे सल्लागार शुल्क, दूरध्वनी खर्च, वाहन खर्च व अन्य कार्यालयीन खर्चाचा समावेश आहे.

➢ उपकर जमा करणा-या प्राधिकरणांना उपकर जमा करण्यासाठी येणारा खर्च (जास्तीत जास्त जमा उपकराच्या १%)

➢ उपकर परताव्याच्या प्रकरणावरील खर्च.

> मंडळाच्या कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवरील व मागील तीन वर्षातील खर्च व सन २०१८-१९ या वर्षाचा अंदाजित खर्चाचा तपशील

(रू. कोटीत)

| खर्चाचा तपशील | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ (अर्थसंकल्पीय अंदाज) | २०१७-१८ | २०१८-१९ (प्रस्तावित खर्च) |
|---|---|---|---|---|---|---|
| नोंदित बांधकाम कामगारांच्या विविध योजनांवरील खर्च | ७०.७९ | ३५.२१ | १४.७१ | १७६७.०० | १२९.२६ | १८७०.०० |
| प्रशासकीय खर्च | ४३.७८ | २१.०५ | ६.२० | ११.५८ | ६.१४ | २०.०० |

**सन २०१८-१९ मधील खर्चाचे अंदाज**

**अ) कल्याणकारी योजना व योजनांची प्रसार व प्रसिध्दी**

| अ.क्र. | लेखाशीर्ष क्र. | तपशिल | २०१८-१९ |
|---|---|---|---|
| | | कल्याणकारी योजना | रक्कम रुपये कोटीत |
| | E | शैक्षणिक सहाय्य | |
| १. | E01 | नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या २ पाल्यांना शाळेतील किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती असणाऱ्या इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु.२५००/- आणि इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु. ५०००/- एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य. | १३.७५ |
| २. | E02 | नोंदीत लाभार्थी कामगाराच्या २ पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५०% किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास रु. १०,०००/- एवढे प्रोत्साहानात्मक शैक्षणिक सहाय्य. | १६.५० |
| ३. | E03 | नोंदित लाभार्थी कामगाराच्या २ पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु. १०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य. | १६.५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | E04 | नोंदित लाभार्थी कामगाराच्या २ पाल्यांना अथवा पुरूष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु २०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य. | ३३.०० |
| ५. | E05 | नोंदित लाभार्थी कामगाराच्या २ पाल्यांना अथवा पुरूष कामगाराच्या पत्नीस वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेश घेण्यासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इ.साठी प्रती शैक्षणिक वर्षी वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.१,००,०००/- व अभियंत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.६०,०००/- इतके शैक्षणिक सहाय्य. | ३३.०० |
| ६. | E06 | नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना, शासनमान्य पदविकेमध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रती शैक्षणिक वर्षी रू २०,००० आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्या प्रति शैक्षणिक वर्षी रु. २५,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. | १३.७५ |
| ७. | E07 | संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती. तथापि, MS-CIT उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास सदर शुल्काची प्रतिपुर्ती करण्यात यावी. | ३.३० |
| | **H** | **आरोग्य सहाय** | |
| ८. | H01 | नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस दोन जिवीत अपत्यांपर्यत नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१५,०००/- व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु. २०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. | ३३.०० |
| ९. | H02 | लाभार्थी कामगार व त्याच्या कुटूंबियांना गंभीर आजाराच्या उपचारार्थ रु.१,००,०००/- एवढे वैद्यकीय सहाय्य. एका सदस्यास केवळ एकदाच आणि कुटूंबातील दोन सदस्यांपर्यत मर्यादित तथापि, आरोग्य विमा योजना लागू नसल्यासच सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. | ११०.०० |
| १०. | H03 | नोंदीत लाभार्थी कामगार अथवा त्याच्या पती/ पत्नीने एका मुलीच्या जन्मानंतर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत रू.१,००,०००/- मुदत बंद ठेव. | ५.५० |
| ११. | H04 | नोंदित लाभार्थी कामगारास ७५% किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु.२,००,०००/-एवढे आर्थिक सहाय्य. तथापि, नोंदीत बांधकाम कामागाराचे विमा संरक्षण असल्यास, विमा रक्कमेची प्रतिपूर्ती अथवा | २२.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मंडळामार्फत रू.२,००,०००/- आर्थिक सहाय्य यापैकी कोणताही एक लाभ अनुज्ञेय राहील. | |
| १२. | H05 | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करणेबाबत | ८.०० |
| १३. | H06 | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांकरीता व्यसनमुक्ती केंद्रांतर्गत उपचाराकरीता नोंदीत बांधकाम कामगारास रू.६०००/- इतके अर्थसहाय्य. | ३.३० |
| | **F** | **आर्थिक सहाय** | |
| १४. | F01 | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु. ५,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. | ३.०० |
| १५. | F02 | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रू.२ लाख आर्थिक सहाय्य देणेबाबत. | २.०० |
| १६. | F03 | नोंदीत बांधकाम कामगाराच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील रू.६.०० लक्ष पर्यंतच्या व्याजाची रक्कम अथवा रू.२.०० लक्ष मंडळामार्फत देणेबाबत. | ५०.०० |
| १७. | F04 | प्रधानमंत्री आवास योजनेत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना. मंडळामार्फत रु.२ लक्ष अनुदान देणे प्रस्तावित आहे. | ६०.०० |
| १८. | F05 | नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या नामनिर्देशित केलेल्या वारसास रु. १०,०००/- एवढी रक्कम अंत्यविधीसाठी मदत. | ५.५० |
| १९. | F06 | नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगाराचे विधुर पतीस प्रतीवर्षी रु. २४,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. (फक्त पाच वर्षासाठी) | १३.२० |
| | **S** | **सामाजिक सहाय** | |
| २०. | S01 | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी रु. ३०,०००/- अर्थसहाय्य. | ६.६० |
| २१. | S02 | बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणे. (सर्व जिवित नोंदित बांधकाम कामगारांना समाविष्ट केल्यास). | २९०.०० |
| २२. | S03 | नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांना व्यक्तिमत्त्व विकास पुस्तक संचाचे वाटप. | १.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | E04 | नोंदित लाभार्थी कामगाराच्या २ पाल्यांना अथवा पुरूष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु २०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य. | ३३.०० |
| ५. | E05 | नोंदित लाभार्थी कामगाराच्या २ पाल्यांना अथवा पुरूष कामगाराच्या पत्नीस वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेश घेण्यासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इ.साठी प्रती शैक्षणिक वर्षी वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.१,००,०००/- व अभियंत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.६०,०००/- इतके शैक्षणिक सहाय्य. | ३३.०० |
| ६. | E06 | नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना, शासनमान्य पदविकेमध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रती शैक्षणिक वर्षी रू.२०,००० आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्या प्रति शैक्षणिक वर्षी रु. २५,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. | १३.७५ |
| ७. | E07 | संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती. तथापि, MS-CIT उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास सदर शुल्काची प्रतिपुर्ती करण्यात यावी. | ३.३० |
| | **H** | **आरोग्य सहाय** | |
| ८. | H01 | नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस दोन जिवीत अपत्यांपर्यंत नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१५,०००/- व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु. २०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. | ३३.०० |
| ९. | H02 | लाभार्थी कामगार व त्याच्या कुटूंबियांना गंभीर आजाराच्या उपचारार्थ रु.१,००,०००/- एवढे वैद्यकीय सहाय्य. एका सदस्यास केवळ एकदाच आणि कुटूंबातील दोन सदस्यांपर्यंत मर्यादित तथापि, आरोग्य विमा योजना लागू नसल्यासच सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. | ११०.०० |
| १०. | H03 | नोंदीत लाभार्थी कामगार अथवा त्याच्या पती/ पत्नीने एका मुलीच्या जन्मानंतर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत रू.१,००,०००/- मुदत बंद ठेव. | ५.५० |
| ११. | H04 | नोंदित लाभार्थी कामगारास ७५% किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु.२,००,०००/-एवढे आर्थिक सहाय्य. तथापि, नोंदीत बांधकाम कामागाराचे विमा संरक्षण असल्यास, विमा रक्कमेची प्रतिपूर्ती अथवा | २२.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मंडळामार्फत रू.२,००,०००/- आर्थिक सहाय्य यापैकी कोणताही एक लाभ अनुज्ञेय राहील. | |
| १२. | H05 | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करणेबाबत | ८.०० |
| १३. | H06 | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांकरीता व्यसनमुक्ती केंद्रांतर्गत उपचाराकरीता नोंदीत बांधकाम कामगारास रू.६०००/- इतके अर्थसहाय्य. | ३.३० |
| | **F** | **आर्थिक सहाय** | |
| १४. | F01 | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु. ५,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. | ३.०० |
| १५. | F02 | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रू.२ लाख आर्थिक सहाय्य देणेबाबत. | २.०० |
| १६. | F03 | नोंदीत बांधकाम कामगाराच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील रू.६.०० लक्ष पर्यंतच्या व्याजाची रक्कम अथवा रू.२.०० लक्ष मंडळामार्फत देणेबाबत. | ५०.०० |
| १७. | F04 | प्रधानमंत्री आवास योजनेत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना- मंडळामार्फत रु.२ लक्ष अनुदान देणे प्रस्तावित आहे. | ६०.०० |
| १८. | F05 | नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या नामनिर्देशित केलेल्या वारसास रु. १०,०००/- एवढी रक्कम अंत्यविधीसाठी मदत. | ५.५० |
| १९. | F06 | नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगाराचे विधुर पतीस प्रतीवर्षी रु. २४,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. (फक्त पाच वर्षासाठी) | १३.२० |
| | **S** | **सामाजिक सहाय** | |
| २०. | S01 | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी रु. ३०,०००/- अर्थसहाय्य. | ६.६० |
| २१. | S02 | बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणे. (सर्व जिवित नोंदित बांधकाम कामगारांना समाविष्ट केल्यास). | २९०.०० |
| २२. | S03 | नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांना व्यक्तिमत्व विकास पुस्तक संचाचे वाटप. | १.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २३. | S04 | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना बांधकामासाठी उपयुक्त/ आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरीता प्रतिकुटुंब रू.५०००/- अर्थसहाय्य देणेबाबत. | २२५.०० |
| २४. | S05 | जिवित नोंदित बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना लागु करणेबाबत. | १६.५० |
| २५. | S06 | जिवित नोंदित बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना लागु करणेबाबत. | ०.६० |
| २६. | S07 | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांना पूर्व शिक्षण (RPL) ओळख योजना लागू करणे. | १५६.०० |
| २७. | S08 | नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षेसाठी सुरक्षा संच (Safety Kit) पुरविणेबाबत | २५०.०० |
| २८. | S09 | नोंदीत बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविणेबाबत | २५०.०० |
| | | **एकुण योजनावरील खर्च** | **१६४१.००** |

| अ. क्र. | लेखा शीर्ष क्र. | **प्रस्तावित योजनावरील अपेक्षित खर्च** | **रक्कम रुपये कोटीत** |
|---|---|---|---|
| १. | P01 | एकात्मिक कल्याणकारी मंडळ व्यवस्थापन प्रणाली(IWBMS) योजना. | १४.०० |
| २. | P02 | पूर्ण अद्दयावत सुलभीकरण केंद्र स्थापन करणे (जिल्हा आणि क्षेत्रीयस्तरावर) एकूण ४१ ठिकाणी. | १०.०० |
| ३. | P03 | नोंदित बांधकाम कामगारांना मोबाईल टॉयलेट सुविधा पुरविणे. | ५०.०० |
| ४. | P04 | बांधकाम ठिकाणी नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करणे. | २०.०० |
| ५. | P05 | नोंदित बांधकाम कामगारांना सायकल वाटप. | १३५.०० |
| | | **एकूण** | **२२९.००** |

ब) प्रशासकीय खर्च (रुपये लाखात)

| लेखाशीर्ष क्र. | प्रशासकीय / कार्यालयीन अपेक्षित खर्च | रक्कम |
|---|---|---|
| A01 | वेतन व भत्ते | ६०.०० |
| A02 | मजुरी | ०.६० |
| A06 | दूरध्वनी, मोबाईल व वीज देयके | २.०० |
| A10 | कंत्राटी पद्धतीवर घेतलेल्या सेवेवरील खर्च | ६००.०० |
| A11 | प्रवास खर्च | ५०.०० |
| A 13 | कार्यालयीन स्टेशनरी व छपाई | ३००.०० |
| A 14 | भाडे, पट्टी व कर | २४.०० |
| A 16 | योजनांचा प्रसार व प्रसिध्दी | ६३०.०० |
| A 17 | संगणक व इतर यंत्रसामुग्री खरेदी व देखभाल दुरूस्ती | १५०.०० |
| A 19 | मंडळ सदस्यांचे मानधन व बैठकांचा खर्च | २०.०० |
| A 24 | पेट्रोल, तेल व वंगण खर्च | १८.०० |
| A 26 | जाहिरात व प्रसिद्धी | २१.०० |
| A 28 | व्यावसायिक कर | ५०.०० |
| A 30 | वार्षिक लेखे व लेखापरीक्षण वरील खर्च | २५.०० |
| A 50 | इतर खर्च | ५०.०० |
| एकूण अपेक्षित प्रशासकीय खर्च | | २०००.०६ |

क) उपकर परतावा (रुपये कोटीत)

| अ. क्र. | कायदयाच्या नियम व अधिनियमानुसार करावयाची तरतुद | रक्कम |
|---|---|---|
| C01. | उपकर जमा करणा-या प्राधिकरणांना उपकर जमा करण्यासाठी येणारा खर्च (जास्तीत जास्त जमा उपकराच्या १%) | १४.०० |
| C02. | उपकर परताव्यांची प्रकरणे. | १६.०० |
| | **एकूण** | **३०. ००** |
| | **एकूण अपेक्षित खर्च** | **१९२०.००** |

## * सन २०१८-१९ मधील अपेक्षित जमा व खर्चाचा गोषवारा *

(रू. कोटीत)

| अ.क्र | बाब (जमा) | अपेक्षित जमा | बाब (खर्च) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | उपकर | १२५०.०० | कामगार कल्याणकारी योजनांवरील खर्च | १८७०.०० |
| २ | बँकेतील मुदतठेवीवरील व्याज | ४११.०० | प्रशासकिय खर्च | २०.०० |
| ३ | नोंदणी फी | ०.६५ | उपकर परतावा | १६.०० |
| ४. | मासिक वर्गणी | ०.३५ | उपकर जमा करण्याचा खर्च १% च्या मर्यादेत | १४.०० |
| | **एकूण जमा** | **१६६२.००** | **एकूण खर्च** | **१९२०.००** |

**विषय क्र. १५: मंडळाच्या दिंनाक १६.०६.२०१६ च्या बैठकीतील ठरावानुसार उपकराच्या एकूण ११ प्रकरणाच्या परताव्यास मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम १९९६ मधील कलम ३(१) व भारत सरकार यांचे दि. २३.०९.१९९६ चे परिपत्रक तसेच महाराष्ट्र शासनाच्या दि. २१.०४.२००८ च्या परिपत्रकानूसार बांधकामावरील खर्चाच्या १ टक्केपेक्षा कमी नाही एवढा (जमीनीची किंमत वगळून) उपकर मंडळाकडे जमा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार, विविध प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून मंडळाकडे उपकर भरणा केला जातो.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८ मधील कलम ८ अन्वये उपकराची परिगणना चूकीची झाल्यास अथवा चुकीच्या पध्दतीने उपकराचा भरणा मंडळाकडे झाल्यास तो परतावा करण्याबाबत तरतूद आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बँक खात्यात अनावधानाने/नजरचुकीने उपकराची जास्तीची रक्कम भरणा केलेल्या एकूण १८ प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून उपकराच्या रकमेच्या परताव्याची मागणी करण्यात आलेली होती. सदर उपकर परताव्याची प्रकरणे मंडळाच्या दि. १६.०६.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यतेस्तव सादर करण्यात आली होती. मंडळाच्या बैठकीत चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला होता.

**ठराव: उपकराच्या परताव्यांचे प्रत्येक प्रकरण हे मंजूरीसाठी मंडळासमोर ठेवून, ज्यांच्याकडून चुकीने पैसे प्राप्त झाले आहेत त्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ते तपासून त्यांना परत करण्यात यावेत.**

मंडळाच्या पारीत ठरावानुसार सदर १८ परतावा प्रकरणांबाबत संबंधित क्षेत्रिय कार्यालयांना प्राधिकरणे/संस्था यांजकडे प्रत्यक्ष भेट देवून त्याबाबतचा वस्तूनिष्ठ अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यापैकी, ५ प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांनी मंडळाकडे अनावधानाने/नजरचुकीने भरणा केलेल्या उपकराच्या रकमेच्या परताव्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून अहवाल प्राप्त् झाला असून संबंधितांना भरणा केलेल्या जास्तीच्या उपकराच्या रक्कमेचा परतावा करण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे. परंतू, त्यामधील मे. खरे ॲन्ड ताराकुंडे इन्फा्रस्ट्रक्चर प्रा.लि. नागपूर यांनी दि. ०७.१०.२०११ ते मार्च २०१६ या कालावधीत मंडळास भरणा केलेल्या उपकराच्या रकमेच्या परताव्याची शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २१.०४.२००८ च्या परिपत्रक व दि. १७.०७.२०१० च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने मंडळाकडे मागणी करण्यात

आली होती. त्यामुळे सदर प्रकरण शासनाकडे मंडळाच्या दि. ०६.१०.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शनासाठी सादर करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने, सदर प्रकरणी शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्या क्रमांक:इबांका-२०१६/प्र.क्र.३६१/काम-७ दि. २७.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये, मे.खरे अँड तारकुंडे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. नागपूर या प्रकरणासारख्याच प्रिसिजन कॅमशॉफ्ट लि. या प्रकरणी शासनाच्या विधी व न्याय विभागाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम, १९९८ मधील तरतूदीनुसार **"एकदा भरणा केलेली उपकराची रक्कम परत करता येणार नाही"** असे अभिप्राय दिलेले आहेत. त्यामुळे मे. खरे अँड तारकुंडे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. नागपूर यांनी मागणी केलेल्या उपकराच्या परताव्याची रक्कम त्यांना अदा करता येणार नाही. असे कळविले आहे. शासनाकडून वरीलप्रमाणे उपकराच्या परताव्याबाबत अभिप्राय प्राप्त झाल्यामुळे उर्वरीत प्रकरणांचा परतावा अद्याप प्रलंबित असून याबाबत मंडळाच्या दि. २३.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ मधील कलम ८ अन्वये चुकीने भरणा केलेली जास्तीची रक्कम परत करण्याबाबत तरतुद आहे. त्यानुसार मंडळाच्या दि.१६.०६.२०१६ च्या बैठकीमध्ये उपकर परताव्याबाबत वरीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला असून त्यानुसार मंडळाकडे क्षेत्रीय कार्यालयाकडून परताव्याबाबत शिफारस केलेली उर्वरीत ४ प्रकरणे मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आलेली आहेत.

त्यानुषंगाने, मंडळाकडे सद्यस्थितीत प्राप्त झालेल्या नजरचूकीने/अनावधानाने भरणा केलेल्या उपकर परताव्याच्या प्रकरणांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अनु. क्र. | प्राधिकरण/संस्था/व्यक्तिचे नाव | उपकर परताव्याचे कारण | उपकर परताव्याच्या मागणीची रक्कम (रुपयात) |
|---|---|---|---|
| १. | छत्रपती शिवाजी महाराज स्मारक | सल्लागाराच्या देयकातून वजावटीची रक्कम | ४,७३,५१९/- |
| २. | मे. पुरोहित अॅन्ड असोसिएट्स | चुकीच्या पध्दतीने उपकराची परिगणना केल्यामुळे जादा भरणा केलेली रक्कम | १५,३८,००५/- |
| ३. | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पूणे | नजरचुकीने उपकराची रक्कम रु. ३,४३,८५२/- ऐवजी रु.४,८६,३२२/- भरणा केलेली आहे. | १,४२,४७०/- |
| ४. | ईपीसीओएस इंडिया प्रा.लि., | कारखाने अधिनियम १९४८ | ४९,५९,०१६/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | नाशिक. | नुसार उपकराची सुट असतांना चुकीने भरणा केलेली रक्कम | |
| ५. | लोटस ग्रीह निर्माण प्रा.लि. | उपकराच्या चुकीच्या परिगणनामुळे भरणा केलेली रक्कम | ४५,३३,३२२.७५/- |
| ६. | शुभलक्ष्मी लँड डेव्हलपर्स, नागपूर. | आयडीबीआय बँकेने नजरचुकीने जास्तीचा भरणा केलेली उपकराची रक्कम | ५,८७,६९२/- |
| ७. | ॲडव्होकेट आलोक चौधरी | महानगरपालिका नागपूर यांचे इमारत बांधकाम शुल्क नजरचुकीने मंडळाच्या खात्यावर जमा केलेले आहे. | ५,९६,७१२/- |
| ८. | श्री. रमेश दामोदर गट्टेवार, नागपूर. | महानगरपालिका नागपूर यांनी उपकराची परिगणना केल्यामुळे भरणा केलेली रक्कम | ४३,४२२/- |
| ९. | श्री. जयकृष्ण आत्माराम उमाळकर, नागपूर. | महानगरपालिका नागपूर यांचे इमारत बांधकाम शुल्क नजरचुकीने मंडळाच्या खात्यावर जमा केलेले आहे. | २,५४,६३४/- |
| १०. | कार्यकारी अभियंता, सामान्य बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे. | नजरचुकीने उपकराची रु. ४,१८,०३०/- ऐवजी रु. ४१,८०,३०६/- भरणा केलेली रक्कम | ३७,६२,२७६/- |
| ११. | बोरा ॲग्रो फुडस्, ता. दौंड, जिल्हा-पूणे. | कारखाने अधिनियम १९४८ नुसार उपकराची सुट असतांना चुकीने भरणा केलेली रक्कम | ३४,८५,२९१/- |
| | **एकूण रक्कम रु.** | | **२,०३,७६,३५९.७५/-** |

तरी, उक्त प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून मंडळाकडे अनावधानाने/नजरचुकीने भरणा केलेल्या रक्कम रु. २,०३,७६,३५९.७५ एवढया ११ उपकराच्या परताव्याची प्रकरणे मंडळाच्या दि.१६.१६.२०१६ च्या बैठकीतील ठरावाच्या अनुषंगाने मान्यतेसाठी सादर.

मंडळ मान्यतेनंतर सदर परताव्याची प्रकरणे संबंधित क्षेत्रिय कार्यालयांकडे पडताळणीसाठी पाठविण्यात येतील. पडताळणीचा अहवाल व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या परताव्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

यावर मा. उपसचिव (कामगार) यांनी सदर सर्व प्रकरणांचा सविस्तर अहवाल जिल्हा कार्यालयांकडून मागवून घ्यावा असे सुचित केले. तसेच सदर परतावा प्रकरणे जिल्हा कार्यालयांना तपासणीसाठी पाठवून जिल्हा कार्यालयांचा पडताळणी अहवाल व विभागीय कार्यालयांचे परताव्याबाबतची शिफारस प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणे मंडळाने शासन मान्यतेस्तव सादर करावी, असेही सुचविले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली. तसेच मा. कामगार आयुक्त यांनीही परताव्याची रक्कम जास्त असल्यामुळे सर्व प्रकरणांची योग्य ती चौकशी करूनच रक्कमेचा परतावा करण्यात यावा, अशा सुचना दिल्या.

**ठराव: मंडळाच्या दिंनाक १६.०६.२०१६ च्या बैठकीतील ठरावानुसार उपकराच्या एकूण ११ प्रकरणांचा परतावा करताना सदर प्रकरणे संबंधित जिल्हा कार्यालयांकडून छाननी करून विभागीय कार्यालया मार्फत परताव्याच्या शिफारस प्राप्त झाल्यानंतर मंडळ स्तरावर छाननीअंती प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेनुसार मंडळ स्तरावरून परताव्याची कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.१६: मंडळाच्या मुदत ठेव गुंतवणूकीचा माहे जाने २०१८ पर्यंतचा गोषवारा सादर करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर कल्याणकारी मंडळाच्या दि. १८.०७.२०१७ रोजीच्या संपन्न झालेल्या बैठकीमध्ये माहे जून, २०१७ पर्यंतची मंडळाने केलेल्या रक्कम रु. ४६५० कोटी मुदत ठेव गुंतवणूकीचा गोषवारा सादर करण्यात आला होता व सदर गोषवाऱ्यातील गुंतवणूकीस व गुंतवणूकीच्या व्याजदरास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

शासन वित्त विभागाच्या दि. २७.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार गुंतवणूकीचा ऑक्टोबर २०१७ ते डिसेंबर २०१७ या कालावधीचा त्रैमासिक अहवाल दि. २३.०१.२०१८ रोजी प्रशासकीय विभागास सादर करण्यात आलेला आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार प्रत्येक महिन्याला मुदत ठेवीच्या रकमा सुरक्षित असून त्यावर कोणत्याही प्रकारचे कर्ज/तारण/ओवर ड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र संबंधित बँकांकडून घेणे अनिवार्य आहे. त्यानुसार मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक ज्या बँकांत करण्यात आलेली आहे त्या बँकाकडुन प्रत्येक महिन्याला मंडळाची गुंतवणूक सुरक्षित असून त्यावर कर्ज/तारण/ओवर ड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र नियमित प्राप्त करून घेण्यात येतात त्यानुसार माहे डिसेंबर २०१७ पर्यतच्या कालावधीत मंडळाच्या सर्व गुंतवणुकदार बँकांकडून त्यांच्याकडील मंडळाची मुदत ठेव गुंतवणुक सुरक्षित असल्याची प्रमाणपत्रे सादर केलेली असून त्याबाबतचा अहवाल मा. कामगार आयुक्त व मंडळाचे अध्यक्ष यांच्या अवलोकनार्थ दरमहा नियमित सादर करण्यात आलेला आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयातील निर्देशानुसार मुदत ठेव गुंतवणुकीबाबत बँकेत अथवा इतर वित्तीय संस्थामध्ये गुंतविलेल्या निधीची आवश्यक ती तपासणी २-३ महिन्याच्या कालांतराने प्रत्यक्ष बँकेत अथवा वित्तीय संस्थेमध्ये जाऊन नियमित स्वरूपात संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतः करण्याबाबत नमूद आहे. त्याप्रमाणे मंडळाचे लेखाअधिकारी यांनी दि. १६.१०.२०१७ रोजी व ०६.११.२०१७ रोजी प्रत्यक्ष संबंधित बँकांना भेटी देऊन गुंतवणुकीचा अहवाल मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी व मा. कामगार आयुक्त यांना सादर केला आहे.

शासनाच्या दि. ०२.०२.२०१८ रोजीच्या पत्रानुसार सर्व ठेवीदार बँकांकडून विहित केलेल्या नमुन्यात माहे जानेवारी २०१८ पासून मंडळाच्या सर्व बँकांकडून मंडळाची मुदत ठेव गुंतवणुक

सुरक्षित असल्याची प्रमाणपत्रे घेण्याबाबत कळविले आहे त्यानुसार सदरबाबतचा विहित नमुना सर्व बँकांना पाठविण्यात आला असून माहिती प्राप्त होताच शासनास सादर करण्यात येईल.

**मंडळाच्या दि. २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीतील गुंतवणुकीच्या मर्यादेबाबत खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.**

राष्ट्रीयकृत बँकेत एकाच वेळी गुंतवणूकीची रु. ५०० कोटीची मर्यादा शिथील करून त्या दिवशी ज्या राष्ट्रीयकृत बँकेचे व्याजदर सर्वात जास्त असतील त्या राष्ट्रीयकृत बँकेत त्या दिवशीच्या प्रस्तावित रक्कमेची गुंतवणूक करण्यात यावी. तसेच त्या दिवशीच्या गुंतवणूक प्रक्रीयेत सहभागी राष्ट्रीयकृत बँकापैकी अन्य बँक त्या दिवशीच्या अधिकत्तम दराने व्याज देण्यास तयार असेल तर प्रस्तावित गुंतवणूकीची रक्कम विभागून गुंतवणूक करण्यात यावी.

**मंडळाच्या उपरोक्त ठरावास अनुसरून मंडळाने माहे जानेवारी, २०१८ अखेर केलेल्या गुंतवणूकीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.**

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवलेली रक्कम (रू.कोटीत) | व्याज दर द.सा. द.शे. | गुंतवणूकीच्या परिपक्वते नंतर मिळणारी रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ इंडिया | ००४२४५११००१४४३५ | ०२.०५.२०१७ | ०२.०५.२०१८ | १००० | ५.१० | १०५१.९८ |
| २ | एच. डी. एफ .सी. बँक | ५०३००२००१८५७९२ | ०२.०५.२०१७ | ०२.०५.२०१८ | १००० | ६.९१ | १०७०.९१ |
| ३ | सिंडीकेट बँक | ५०१४४५८००००२०४/३ SBN४९९१०४ | ०४.०५.२०१७ | ०४.०५.२०१८ | ३९० | ५.६५ | ४१२.५० |
| ४ | कोटक महिंद्रा बँक | १५१२०२२६५८ | ०४.०५.२०१७ | ०४.०५.२०१८ | २६० | ६.९० | २७८.४० |
| ५ | युनियन बँक ऑफ इंडिया | ४४४३०३०३००७५५०३ | २९.०६.२०१७ | २९.०६.२०१८ | ५०० | ५.९० | ५३०.१५ |
| ६ | कॅनरा बँक | १५८९४४१००००२४ KB९९३८७३ | २४.०८.२०१७ | २४.०८.२०१८ | ५०० | ५.९० | ५३०.१५ |
| ७ | कॅनरा बँक | १५८९४४१००००२४ KB९९३८९५ | ०४.१०.२०१७ | ०४.१०.२०१८ | ११०० | ६.०० | ११६७.४९ |
| ८ | बँक ऑफ इंडिया, एम.सी.बी., पुणे | ०५२१४५११०००१४६७ | १६.०८.२०१७ | १६.०८.२०१८ | ३४.६५ | ५.१० | ३६.४५ |

**विषय क्र. १७: मंडळाचे मा. अध्यक्ष यांच्या माहे ऑक्टोबर २०१७ या कालावधीमध्ये रद्द केलेल्या विमान प्रवास रु.१०,८४७/- एवढ्या खर्चास मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाचे मा.अध्यक्ष यांना शासन पत्र दि.०२.०५.२०१६ अन्वये दि.०२.०५.२०१६ पासून राज्यमंत्री पदाचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे मंडळाच्या दि. ०५.१२.२०१७ रोजीच्या बैठकीतील ठरावानुसार त्यांना मंडळाच्या कार्यालयीन कामकाजासाठी विमान प्रवास करणे अनुज्ञेय आहे.

मंडळाच्या अध्यक्षांनी कार्यालयीन कामकाजासाठी माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये मुंबई,नागपूर असा विमानप्रवास केला होता. त्यासाठी वेळोवेळी विमान प्रवासाच्या तिकिटांचे आरक्षण त्यांनी पवनसूत ट्रॅव्हलर्स यांजकडे केले होते. त्याची देयके रक्कम रु. ४७,५३८/- मंडळास सादर करण्यात आली होती व ती सदर कंपनीस दि. १७.०१.२०१८ रोजी अदा करण्यात आलेली आहे. परंतू, त्यामधील आरक्षण रद्द केलेल्या रु. १०,८४७/- शुल्काच्या रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे

| अनु. क्र. | प्रवास | आरक्षण दिनांक | आरक्षण रद्द दिनांक | आकारलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | दिल्ली ते नागपूर | ०५.१०.२०१७, | १३.१०.२०१७ | ३६३६ |
| २ | नागपूर ते मुंबई | १०.१०.२०१७ | १३.१०.२०१७ | २३६ |
| ३ | नागपूर ते मुंबई | १३.१०.२०१७ | २०.१०.२०१७ | २३६ |
| ४ | मुंबई ते नागपूर | १३.१०.२०१७ | २०.१०.२०१७ | ३६०६ |
| ५ | नागपूर ते मुंबई | १५.१०.२०१७ | १८.१०.२०१७ | २३६ |
| ६ | नागपूर ते मुंबई | १६.१०.२०१७ | १८.१०.२०१७ | २६६१ |
| ७ | मुंबई ते नागपूर | १७.१०.२०१७ | २१.१०.२०१७ | २३६ |
| | | | एकूण | १०८४७/- |

वरिलप्रमाणे रद्द केलेल्या आरक्षणाच्या शुल्काची रक्कम रु. १०,८४७/- एवढी असून, सदर रक्कम संबंधित संस्थेस अदा करण्यात आली आहे. आरक्षण रद्द केल्यामुळे झालेला खर्च मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**विषय क्र. १८: आयत्यावेळचे विषय.**

**विषय क्र. १८.०१ :- श्री. श्री. चु. श्रीरंगम, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी, मुंबई यांचे प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत.**

याबाबत मा. कामगार आयुक्त यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दि. ०४.०३.२०१७ अन्वये श्री. श्री. चु. श्रीरंगम, सहसंचालक (लेखा व कोषागारे) यांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सचिव पदावर १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नेमणूक करणे बाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते.

उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या उपरोक्त आदेशास अनुसरून महाराष्ट्र शासन, वित्त विभाग आदेश दि. १४.०३.२०१७ अन्वये श्री. श्री. चु. श्रीरंगम, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी, मुंबई यांची प्रतिनियुक्ती १वर्षासाठी करण्यात आली होती त्याप्रमाणे श्री. श्री. चु. श्रीरंगम यांनी दि.०५.०४.२०१७ रोजी पदभार स्विकारला.

सदर शासन, वित्त विभाग आदेश दि. १४.०३.२०१७ अन्वये श्री. श्री. चु. श्रीरंगम यांची सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी, मुंबई या पदावरील प्रतिनियुक्तीचा १ वर्षाचा कालावधी दि.०५.०४.२०१८ रोजी संपुष्टात येत आहे.

महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून बांधकाम कामगारांची विशेष नोंदणी मोहिम, मंडळाच्या नियमित योजना याशिवाय अटल पेन्शन योजना प्रधानमंत्री आवास योजना, नोंदित बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक वस्तुसंच पुरविणे,मंडळाच्या एकात्मिक संगणकिकरणाची निविदा प्रक्रिया, जिल्हास्तरावर ४० कामगार कल्याण केंद्र (WFC) उभारणी करणे , मंडळाच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे सेवाप्रवेश नियम तयार करून मंडळ, तज्ञसमिती व शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करणे इ. अनेक बाबी प्रस्तावित आहेत. तसेच, मंडळामध्ये स्वत:चे अधिकारी कर्मचारी नियुक्त केलेले नाही. प्रस्तावित योजनांच्या अंमलबजावणी मध्ये श्री. श्री. चु. श्रीरंगम यांचा मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून महत्वाचा सहभाग आहे प्रस्तावित कामांकरीता मंडळास त्यांच्या सेवेची आवश्यकता आहे. सदर बाब विचारात घेता श्री. श्री. चु. श्रीरंगम यांची सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार

कल्याणकारी, मुंबई या पदावरील प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मंडळाकडे सादर करण्यात येत आहे.

मंडळाच्या मान्यते अंती कामगार विभागामार्फत वित्त् विभागास प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: बांधकाम कामगारांची मंडळाकडे नोंदणी, मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना व प्रस्तावित कल्याणकारी योजना संदर्भात करावयाच्या कार्यवाही करीता श्री. श्री. चु. श्रीरंगम, यांच्या सेवेची मंडळास आवश्यकता आहे. श्री. श्री. चु. श्रीरंगम, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या प्रतिनियुक्तीस दिनांक ०५.०४.२०१८ पासुन पुढील २ वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे, मुदतवाढीबाबतचा प्रस्ताव कामगार विभागामार्फत वित्त विभागास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. १८.०२ :- श्री. अरविंद शंकरराव तेलवाडकर (कामगार कल्याण अधिकारी) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, जि. औरंगाबाद यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी ०२ वर्षे वाढविणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, कामगार उप आयुक्त, औरंगाबाद कार्यालयामार्फत श्री. अरविंद शंकरराव तेलवाडकर (कामगार कल्याण अधिकारी) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, जि. औरंगाबाद यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी ०२ वर्षे वाढविणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

श्री. अरविंद शंकरराव तेलवाडकर यांची माथाडी मंडळातून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, जि. औरंगाबाद येथे कामगार कल्याण अधिकारी या पदावर शासनाच्या मंजूरीने व मा. कामगार आयुक्त, मुंबई यांच्या दि.१३.०१.२०१४ रोजीच्या आदेशान्वये प्रतिनियुक्ती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, जि. औरंगाबाद या कार्यालयाची बांधकाम कामगारांची नोंदणी, कामगारांच्या लाभाचे प्रस्ताव इत्यादी रेकॉर्ड जतन करणेबाबत, तसेच अहवाल व लेखाविभागातील सर्व कामकाजावर नियंत्रण ठेवणे व दैनंदिन प्रशासकीय आस्थापना विभागाची कामकाज करण्यासाठी औरंगाबाद कार्यालयास श्री. अरविंद शंकरराव तेलवाडकर यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळावर कामगार कल्याण अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मंडळाकडे सादर करण्यात येत आहे.

मंडळाच्या मान्यते अंती श्री. अरविंद शंकरराव तेलवाडकर यांच्या मुदतवाढीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सविस्तर चर्चेअंती खलीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: श्री. अरविंद शंकरराव तेलवाडकर (कामगार कल्याण अधिकारी) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, जि. औरंगाबाद यांच्या प्रतिनियुक्तीस पुढील २ वर्षे मुदतवाढ देण्याबाबत उप आयुक्त, कामगार, औरंगाबाद यांनी मंडळास**

सादर केलेल्या मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे, मुदतवाढीबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र. १८.०३: राजस्थान राज्यातील बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहितीकरीता अभ्यास दौरा.**

मंडळाच्या बैठकीत राज्यात कार्यान्वित विविध कल्याणकारी योजना व त्यावरील खर्चाबाबत चर्चा करण्यात आली. सदर चर्चेदरम्यान अन्य राज्यातील कल्याणकारी योजनाबाबतची माहिती घ्यावी असे ठरले. याबाबत मा. मंत्री महादेय (कामगार) यांनी असे निर्देश दिले की, मंडळाचे सदस्य, अधिकारी व मंडळाचे सल्लागार मे. केपीएमजींचे प्रतिनिधी यांचा राजस्थान राज्याचा दौरा आयोजित करून त्या राज्यात बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येत असेलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा अभ्यास करावा.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव: राजस्थान राज्यातील बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती प्राप्त करण्यासाठी मंडळाचे सदस्य, अधिकारी व मंडळाचे सल्लागार मे. केपीएमजींचे प्रतिनिधी यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात यावा व त्याबाबतचा अहवाल मंडळास सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

सर्व विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मंडळ सचिव यांनी मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांचे व सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

******************